दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–४३ शुक्रवार, दि.६ जुन २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘इ साला कप नमदे’!

आयपीएलची सुरुवात २००८ सालापासून झाली. तेव्हापासून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ आयपीएल चषक उंचावण्याचे स्वप्न पाहत होता. या संघात अनेक खेळाडू आले–गेले. विराट कोहली मात्र १८ वर्षे संघाबरोबर राहिला. याआधी आरसीबीचा संघ तीन वेळा अंतिम सामन्यात दाखल झाला होता. परंतु तिन्ही वेळा उपविजेतेपदावर त्यांना समाधान मानावे लागले होते. यंदा चौथ्यांदा आरसीबीने अंतिम फेरी गाठली आणि अखेर त्यांचं ‘घोडं गंगेत न्हालं’! तब्बल १८ वर्षांनंतर आरसीबीची आणि १८ नंबर जर्सीची स्वप्नपूर्ती झाली. आयपीएल २०२५ च्या चषकावर आरसीबीचे नाव कोरले गेले.

### डोनाल्ड ट्रम्प यांचे पुन्हा टॅरिफ अस्त्र

न्युयार्क : अमेरिकेने व्यापार भागीदारी देशांकडून आयात केल्या जाणाऱ्या पोलाद आणि अॅल्युमिनियमवरील कर २५ टक्क्यांवरून दुपटीने वाढवून थेट ५० टक्के करण्याची घोषणा केलीआहे. जुलैमध्ये आणखी दंडात्मक आयातशुल्क टाळायचे असेल तर व्यापारी भागीदार देशांनी सर्वोत्तम प्रस्ताव द्यावेत असेही अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने सुचवले आहे. अमेरिकेच्या निर्णयामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत पुन्हा गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.

# कोरोनाच्या वाढत्या प्रार्दुभावामुळे शेतकरी चिंतेत!

## लॉकडाऊनच्या भीतीने भाजीपाला, फळपिके घेण्यात धोका

बीड । प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसापासून देशात व राज्यात कोरोनाचे रुग्ण झपाट्याने वाढत असल्याने शेतकरी मात्र चिंतेत आहेत. कोरोनामुळे लॉकडाऊन पडले तर शेतात घेतलेला भाजीपाला पिके, फळपिकांची विक्री करायची कुठे? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.**

कोरोना काळात लॉकडाऊन पडल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले होते. ज्या शेतकऱ्यांनी एक एकर, दोन किंवा त्या पेक्षा जास्त क्षेत्रावर भाजीपाला पिके, टरबुज, खरबुज यासह फळांची विक्री करण्याची मोठी समस्या निर्माण झाली होती. परिणामी त्यावेळी शेतातच पिकांवर रोटावेटर फिरवण्याची शेतकऱ्यांवर वेळ आली होती. त्यामुळे पिकांचा झालेला खर्चही निघाला नव्हता. सध्या देशात व राज्यात कोरोना झपाट्याने वाढत असून दररोज रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. तसेच कोरोनामुळे मृत्यूचे प्रमाणही वाढले असून जर भविष्यात कोरोनाचा प्रार्दुभाव झपाट्याने वाढला तर त्याचा परिणाम जनजीवनावर होणार

◀◀ पान २ वर




### नागरीकांनी घाबरु नये, काळजी घ्यावी–आबिटकर



राज्यात सध्या कोरोनाचे ४९४ रुग्ण असून वाढत्या संक्रमणाच्या पार्श्वभुमीवर आपण प्रशासनाला गतीने आणि जबाबदारीने काम करण्याच्या सुचना दिल्या असल्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. तसेच नागरीकांनी घाबरुन न जाता काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

### राज्यात कोरोनाचे १०५ नवे रुग्ण

राज्यात दिवसेंदिवस कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होताना दिसून येत असून राज्यामध्ये १०५ नवे रुग्ण आढळून आले आहेत. यात तीन रुग्णांचा मृत्यू झाला असून राज्यातील नव्या १०५ रुग्णांमध्ये पुण्यात ३३ रुग्ण, मुंबईत ३२, ठाण्यात १४, नवी मुंबईत ९, साताऱ्यात ५ रुग्णांचा समावेश आहे. राज्यातील कोरोना रुग्णांची संख्या १ हजार ६ वर गेली. तर मुंबईतील रुग्णांची संख्य ५४१ इतकी झाली आहे.

## थोडक्यात...

### खासदार महुआ मोईत्रा यांनी केले लग्न

कोलकाता–तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी माजी खासदार पिनाकी मिश्रासोबत लग्न केले आहे. बिजू जनता दलाचे माजी खासदार पिनाकी मिश्रा आणि महुआ मोईत्रा यांनी जर्मनीमध्ये ३ मे रोजी लग्न केले. त्यांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

### राज्यातील ९०३ योजनांच्या प्रशासकीय मान्यता रद्द

मुंबई–राज्य सरकारने आज मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने राज्यातील ९०३ योजनांच्या प्रशासकीय मान्यता रद्द केल्या आहेत. ३ वर्षांपासून रखडलेल्या आणि प्रलंबित असलेल्या योजना बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. भूसंपादन, स्थानिकांचा विरोध आणि ठेकेदारांच्या असहकार्यामुळे या योजना रखडल्या होत्या. मृद आणि जलसंधारण विभागाकडून हा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. रद्द करण्यात आलेल्या योजनांमध्ये ल. पा. योजना, कोकण पाट बंधारे, पाझर तलाव, साठवण तलासमावेश दुरुस्ती योजनांचा समावेश आहे.

### मंत्री उदय सामंत मुख्यमंत्री फडणवीसांच्या भेटीला

मुंबई–मंत्री उदय सामंत मुख्यमंत्री फडणवीसांच्या भेटीला गेले होते. तटकरे–गोगावले वादावर मुख्यमंत्र्यांशी त्यांनी चर्चा केल्याचा अंदाज आहे.

### तुळजाभवानी मंदिराच्या आराखड्यास कोर्टात आव्हान देणार

तुळजापूर–श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्याच्या विरोधात भोपे पुजारी मंडळ उच्च न्यायालयात जाणार आहे. पुजारी मंडळाला विश्वासात न घेता १८६५ कोटी रुपयांच्या तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्याला राज्य सरकारने मान्यता दिल्याचा आरोप या मंडळाने केला आहे.

### शरद पवारांच्या आमदाराकडून एकनाथ शिंदेंचे स्वागत

मोहोळ–राष्ट्रवादी शरद पवार गटाचे मोहोळचे आमदार राजू खरे यांच्याकडून मोहोळ दौऱ्यावर येणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्वागताची जाहिरात देण्यात आली आहे. स्वामींच्या पावन नगरीत अनाथांचे नाथ एकनाथ शिंदे साहेब यांचे सहर्ष स्वागत अशा आशयाची जाहिरात देण्यात आली आहे.

### २९ ऑगस्टला मराठे मुंबईत धडकणार– मनोज जरांगे


जालना : मराठा आरक्षण मिळावं म्हणून २९ ऑगस्टला मुंबईला जाणार असून आरक्षण घेणारच असल्याचे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. ५८ लाख नोंदीचा अहवाल सरकारने दिला. सरकारला दीड वर्ष दिले असून आता वेळ दिला जाणार नसल्याचेही मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

### लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात

मुंबई : लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी असून लाडकीला मे महिन्याचा हप्ता येण्यास सुरुवात झाली आहे. गुरुवारपासून लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरेंनी दिली आहे.

# पवारांसह ठाकरे बंधुंच्या मनोमिलनाचे संकेत



मुंबई । प्रतिनिधी

**ठाकरे बंधू अखेर युती करणार असल्याचे नाशकात संकेत मिळाले असून दोन्ही पक्षाचे पदाधिकारी एकत्र आले आहेत. तर दुसरीकडे दोन्ही पवारांचे मनोमिलन होणार असल्याचे बोलले जात आहे. खा. सुप्रिया सुळे यांनी सुध्दा मुकसंमती दिल्याचे दिसते.**

ठाकरेंची शिवसेना आणि मनसेच्या युतीसंदर्भातल्या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले आहे. याचे कारण सिनिअर ठाकरे बंधूंनी एकमेकांना दिलेल्या प्रतिसादानंतर आता ज्युनिअर ठाकरे बंधूदेखील युतीसाठी अनुकूल आहेत. आदित्य ठाकरेंनी राज ठाकरेंना युतीसाठी साद घातली होती. यानंतर आता अमित ठाकरेंनी देखील प्रतिसाद दिला. दोन्ही बंधू एकत्र आले तर काही प्रॉब्लेम नसल्याचे मोठं वक्तव्य त्यांनी केले आहे. दरम्यान दोन्ही पक्षाचे कार्यकर्तेही युतीसाठी अनुकूल असल्याचे चित्र नाशकात समोर आले आहे. नाशिक मधील मनसेच्या राजगड कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात आल्यानंतर वास्तुशांती आणि सत्यनारायण पूजेचे करण्यात आले आहे. यावेळी ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डीजी सूर्यवंशी आणि इतर पदाधिकारी प्रसादाचा लाभ घेण्यासाठी पोहोचले होते. दोन्ही ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चा सुरू असतानाच स्थानिक पातळीवर देखील दोन्ही पक्षातील नेत्यांची जवळीक चर्चेत आली आहे.

विशेष म्हणजे यावेळी ठाकरेंच्या पदाधिकाऱ्यांकडून मनसे कार्यालयासाठी भेटवस्तू देण्यात आली. यामध्ये उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंचा एकत्रित फोटो आहे. यावर हिंदुत्व + ठाकरे = महाराष्ट्र असे लिहिण्यात आले आहे. याची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा असून ठाकरे

◀◀ पान २ वर

### “ नेमकं काय म्हणाल्या सुप्रिया सुळे?



दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणावर खासदार सुप्रिया सुळे यांची काय भूमिका असेल अशी उत्सुकता सर्वच कार्यकर्त्यांना होती. या उत्सुकतेवरुन आता पडदा हटला आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाला सुप्रिया सुळे यांनी मूक संमती दिली आहे. पक्ष घेईल ती भूमिका मान्य असल्याचे सांगून सुप्रिया सुळे यांनी दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाला हिरवा कंदिल दाखवला आहे का अशी चर्चा सुरु झाली आहे.

### दोन्ही बंधू एकत्र आले तर काही प्रॉब्लेम नाही–अमित ठाकरे



मुंबई– दोन्ही बंधू एकत्र आले तर काही प्रॉब्लेम नाही. आदित्य नंतर अमित ठाकरेंचे युतीबाबत मोठे वक्तव्य आहे. ठाकरे बंधूंनी एकमेकांशी फोनवरुन संपर्क साधावा, असेही ते म्हणाले.

# मातोश्री पतसंस्थेतील आरोपींच्या मालमत्ता जप्त होणार

## एमपीआयडी प्रस्तावास मंजुरी; ठेवीदारांना मिळणार दिलासा

बीड । प्रतिनिधी

**मातोश्री महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या, बीड ता.जि. बीड या पतसंस्थे विरुध्द दाखल गुन्हयातील आरोपीतांच्या स्थावर मालमत्तेच्या एमपीआयडी प्रस्तावास गृह विभाग, मंत्रालयातुन मंजुरी आली आहे. त्यामुळे ठेवीदारांना मोठा दिलासा मिळाला असून सर्वच आरोपींच्या मालमत्ता जप्त करण्याची कारवाई केली जाऊ शकते.**

मातोश्री महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बीड ता.जि.बीड था पतसंस्थेची मुख्य शाखा ही सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स, व्यापार संकुल बीड, गाळा क्र.डी–१५ मध्ये होती. सदर पतसंस्थेच्या अपहारातील मुख्य आरोपी व्यवस्थापक, लिपीक/कॅशियर, अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ यांनी मिळून दिनांक ०३/१२/२०१८ ते ०६/०६/२०२२ पावेतो ठेवीदारांना जास्त व्याजदराचे आमीष दाखवून ३२२१ ठेवीदारांच्या ठेवी ठेवुन घेवुन त्यांच्या मुदती संपल्यानंतरही त्यांना परत केलेल्या नव्हत्या. त्या ठेवीदारांपैकी एक ठेवीदार असलेले श्री. विद्याधर विश्वनाथ वैद्य वय ५२ वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा.क्यु बिल्डींग फ्लॅट नं.०२ अमृतसाई प्लाझा रेल्वेस्टेशन रोड औरंगाबाद यांचे तक्रारीवरुन त्यांनी ठेवलेल्या एकुण रक्कम १२,९२,६४०/– रु. त्यांना परत न करता त्यांची फसवणुक केले बाबतचा गुन्हा पो.स्टे. बीड शहर येथे गुन्हा रजि. क्रमांक १५६/२०२२ क. ४२०, ४०६, ३४, १२० (ब) भादवीसह क. ३४ महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे रक्षण करण्याबाबत अधिनियम १९९९, प्रमाणे दाखल करण्यात

◀◀ पान २ वर

# वैष्णवी हगवणे प्रकरणाची आंबाजोगाईत पुनरावृत्ती

## ४ लाखांचा हुंडा दिला तरी आणखी २ लाखांसाठी विवाहितेचा छळ

बीड । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील गीता या गावातील शुभांगी संतोष शिंदे या विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. सासरच्या मंडळींनी छळ केल्याचा आरोप आता माहेरच्या लोकांनी केला असून यापूर्वी आपण चार लाख रुपये दिले होते. यानंतरही दोन लाख आण म्हणून छळ सुरू होता असा दावा नातेवाईकांनी केला आहे. दरम्यान शुभांगी शिंदेंचा मृतदेह स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात आणण्यात आला असून जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचे नातेवाईकांनी सांगितले आहे.

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर राज्यभरातून हुंडा प्रकरणातून सासरच्या मंडळींच्या छळाला कंटाळून केलेल्या अनेक घटना समोर आल्या. दरम्यान अंबाजोगाई

◀◀ पान २ वर

# दुर्घटनेनंतर आरसीबीच्या अडचणीत वाढ, गुन्हा दाखल

बंगळूरु । प्रतिनिधी

**स्वागत समारंभाच्या कार्यक्रमात झालेल्या चेंगराचेंगरीनंतर आता आरसीबी आणि इतरांच्या अडचणीत वाढ होताना दिसत आहे. आरसीबीसह इतरांवर आता क्यूबन पार्क पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

बंगळुरुत बुधवारी ४ जूनला झालेल्या दुर्घटनेप्रकरणी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या अडचणीत वाढ झाली आहे. आरसीबीसह कर्नाटक स्टेट क्रिकेट असोसिएशन आणि डीएनए या इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरसीबी, डीएनए, केएससीए प्रशासकीय समिती आणि इतरांविरुद्ध क्यूबन पार्क पोलिस स्टेशनमध्ये

◀◀ पान २ वर

# समृद्धीवर फडणवीस- शिंदेंच्या हाती स्टेअरिंग

## सरकारची गाडी ३ ड्रायव्हर; म्हणाले, ८–८–८ तासांची शिफ्ट



मुंबई । प्रतिनिधी

समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचं उद्घाटन मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडलं. उद्घाटनानंतर मुख्यमंत्री फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी समृद्धी महामार्गावरून एकाच गाडीतून प्रवास केला. सुरुवातीला एकनाथ शिंदेनी

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.५ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६१.५० क्विंटल | २,३५० | २,६९९ | २,४९० |
| ज्वारी/हायब्रिड: ३५.५० क्विंटल | २,२६५ | २,७७० | २,४०९ |
| मका/लोकल:२४.५०क्विंटल | २,०७५ | २,१९५ | २,१३५ |
| तूर : २.५० क्विंटल | ५,३७१ | ६,५१० | ५,८७० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ३७.०० क्विंटल | २,०४० | २,९५० | २,३९३ |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:५.५० क्विंटल | ४,१०० | ४,१०० | ४,१०० |
| हरभरा: ५.५० क्विंटल | ५,३११ | ५,३११ | ५,३११ |

# प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त

## बीड मतदारसंघातील पात्र कुटुंबांनी लाभ घेण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन



बीड । प्रतिनिधी

**प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून बीड तालुक्यासाठी तब्बल १२०२७ तर शिरूर कासार तालुक्यासाठी ४७९० घरकुलांचे नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे बीड मतदारसंघातील निकषपात्र कुटुंबांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.**

स्वतःचे पक्के घर नसलेल्या कुटूंबांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. यावेळेस बीड मतदारसंघातील बीड व शिरूर कासार तालुक्यासाठी भरघोस उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत पात्र ठरलेल्या व यादीत नाव आलेल्या कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. तसेच घरकुल प्रक्रिया पारदर्शक व्हावी व नागरिकांना यासंदर्भात कसल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याबाबत काळजी घेण्याच्या सूचनाही आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

## अग्रलेख

# ‘इ साला कप नमदे’!

आयपीएलची सुरुवात २००८ सालापासून झाली. तेव्हापासून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ आयपीएल चषक उंचावण्याचे स्वप्न पाहत होता. या संघात अनेक खेळाडू आले-गेले. विराट कोहली मात्र १८ वर्षे संघाबरोबर राहिला. याआधी आरसीबीचा संघ तीन वेळा अंतिम सामन्यात दाखल झाला होता. परंतु तिन्ही वेळा उपविजेतेपदावर त्यांना समाधान मानावे लागले होते. यंदा चौथ्यांदा आरसीबीने अंतिम फेरी गाठली आणि अखेर त्यांचं ‘घोडं गंगेत न्हालं’! तब्बल १८ वर्षांनंतर आरसीबीची आणि १८ नंबर जर्सीची स्वप्नपूर्ती झाली. आयपीएल २०२५ च्या चषकावर आरसीबीचे नाव कोरले गेले. एक लाख प्रेक्षकांनी तुडुंब भरलेल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर ‘इ साला कप नमदे’चा नारा घुमला आणि १८ क्रमांकाच्या जर्सीच्या अश्रूंचा बांध फुटला. ‘इ साला कप नमदे’ म्हणजे ‘यंदाचा कप आमचा’ असा नारा आरसीबीचे चाहते आयपीएल सुरू झाल्यापासून देत होते. अनेक वर्षे विराट कोहलीने आरसीबीचे नेतृत्व केले होते. परंतु सतत अपयश येत असल्याने त्याने संघाचे नेतृत्व सोडले होते. यंदा नेतृत्वाची धुरा रजत पाटीदारकडे सोपवण्यात आली होती. पाटीदारच्या नेतृत्वाखाली आरसीबीने रोमांचक अंतिम सामन्यात पंजाब किंग्जचा ६ धावांनी पराभव करून झळाळता चषक उंचावला. यंदा कोणताही संघ विजयी झाला तरी आयपीएलला नवा विजेता मिळणार होता. कारण दोन्ही संघांना आजवर आयपीएल चषक जिंकता आला नव्हता. यंदा पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून बंगळुरू संघाला प्रथम फलंदाजी दिली होती. बंगळुरूने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ बाद १९० अशी मजल मारली होती.

हे आव्हान पंजाब किंग्ज सहज पार करेल असे वाटले होते. कारण दोनच दिवसांपूर्वी याच मैदानावर पंजाब किंग्जने २००हून अधिक धावांचे लक्ष्य सहज गाठत बलाढ्य मुंबई इंडियन्सला स्पर्धेबाहेर पाठवले होते. मात्र, अंतिम सामन्यात पंजाबचे फलंदाज लक्ष्याचा पाठलाग करण्यात अपयशी ठरले. पंजाबला २० षटकांत ७ बाद १८४ अशी मजल मारता आली. प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंगने पंजाबला ५ षटकांत ४३ धावांची चांगली सलामी दिली होती. १९ चेंडूंत ३ चौकारांसह २४ धावा काढणा-या प्रियांशचा सीमारेषेजवळ सॉल्टने प्रेक्षणीय झेल घेतला. त्यानंतर प्रभसिमरनही २६ धावा काढून परतला. परंतु पंजाबला जबरदस्त धक्का दिला तो शेफर्डने. त्याने श्रेयस अय्यरला एका धावेवर बाद करून पंजाबचे कंबरडे मोडले आणि बंगळुरूच्या गोटात बिजली संचारली. जोश इंग्लिसने ४ षटकार चढवत २३ चेंडूंत ३९ धावा काढल्या होत्या. परंतु कुणालने त्याचा काटा काढला. सीमारेषेवर लिव्हिंगस्टोनने अप्रतिम झेल घेतला. खरे तर कुणाल पंड्याच्या फिरकीने सामना बंगळुरूच्या बाजूने फिरवला. त्याने ४ षटकांत १२ चेंडू निर्धाव टाकले, १७ धावा दिल्या आणि दोन गडी गिळले. मधल्या फळीतील नेहल वधेरा आणि शशांक सिंगने डाव सावरला होता परंतु धावगती वाढवण्याच्या प्रयत्नात नेहल बाद झाला. शशांक सिंगने ३० चेंडूंत ३ चौकार व ६ षटकार खेचत नाबाद ६१ धावा काढत संघाला विजयी करण्याचे शर्थीचे प्रयत्न केले परंतु ते तोकडे पडले. स्टॉइनिस षटकार ठोकून बाद झाला तेव्हा पंजाबच्या आशा संपल्या होत्या. त्याआधी बंगळुरू संघाने २० षटकांत ९ बाद १९० अशी धावसंख्या उभी केली. विराट कोहलीच्या ४३ धावा सर्वाधिक ठरल्या. आरसीबीच्या पहिल्या ७ फलंदाजांनी दुहेरी धावसंख्या काढली परंतु एकालाही मोठी धावसंख्या काढता आली नाही. त्यामुळे एकही फलंदाज अर्धशतकी मजल मारू शकला नाही. सॉल्टने ९ चेंडूंत १६, कोहलीने ३५ चेंडूंत ४३, मयांक अगरवालने १८ चेंडूंत २४, पाटीदारने १६ चेंडूंत २६, लिव्हिंगस्टोनने १५ चेंडूंत २५ तर शेफर्डने ९ चेंडूंत १७ धावा काढल्या. जितेश शर्माने १० चेंडूंत प्रत्येकी २ चौकार व षटकारासह २४ धावा काढल्या. यष्टिरक्षकाच्या डोक्यावरून त्याने मारलेला षटकार ए. बी. डीव्हिलियर्सची याद जागवून गेला. पंजाबतर्फे अर्शदीपने ४० धावांत ३ तर जेमिसनने ४८ धावांत ३ बळी घेतले. सामना पाहण्यासाठी ए. बी. डीव्हिलियर्स आणि ख्रिस गेल उपस्थित होते. ख्रिस गेल बंगळुरूसह पंजाबकडूनही खेळला होता. म्हणून तो शीख समुदायाची पगडी परिधान करून आला होता. हेजलवूडच्या शेवटच्या षटकात बंगळुरूचा विजय पक्का झाला तेव्हा विराट आपले अश्रू आवरू शकला नाही. विराटचे आयपीएल जिंकण्याचे स्वप्न पूर्ण झाले. संपूर्ण हंगामात दमदार आणि सातत्यपूर्ण खेळ हे आरसीबीच्या विजयाचे वैशिष्ट्य ठरले. आरसीबी व्यवस्थापनाने आधीच्या हंगामात झालेल्या चुका टाळून खेळाडूंच्या लिलावात योग्य खेळाडूंची निवड केली आणि त्याचे फळ त्यांना जेतेपदाच्या रूपाने मिळाले. आरसीबीने हेजलवूडसाठी साडेबारा कोटी, सॉल्टसाठी साडेअकरा कोटी, जितेश शर्मासाठी ११ कोटी तर लिव्हिंगस्टोनसाठी पावणे नऊ कोटी मोजले होते. विराट कोहली आणि अर्जेंटिनाचा दिग्गज फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यात बरेच साम्य आहे. मेस्सीने अर्जेंटिनाला अनेक मोठ्या फुटबॉल स्पर्धा, घरगुती स्पर्धा जिंकून दिल्या होत्या. परंतु त्याला फिफा विश्वकप हुलकावणी देत होता. २०२२ मध्ये त्याचे हे स्वप्न पूर्ण झाले. कोहलीच्या संदर्भातही तसेच घडत होते. त्याने १९ वर्षांखालील आयसीसी विश्वकप जिंकला होता, एकदिवसीय विश्वकप (२०११), चॅम्पियन्स ट्रॉफी (२०१३, २५), आशिया कप जिंकला होता. २०२४ च्या टी-२० विश्वकप स्पर्धेच्या विजयी संघातही तो होता. परंतु आयपीएल जेतेपदासाठी तो तरसत होता. अखेर ३ जून २०२५ रोजी त्याची आयपीएल स्वप्नपूर्ती झाली. ‘इ साला कप नमदे’ असे म्हणायची संधी त्याला मिळाली.

# वडवणी तालुक्यातील ११६ शाळांमधील १६९५० विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशीच मिळणार पुस्तके-गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे

वडवणी । प्रतिनिधी

**शालेय शिक्षण विभाग आणि समग्र शिक्षा अभियानांतर्गत राज्यात मोफत पाठ्यपुस्तक योजना प्रभावीपणे राबविली जात असून यावर्षी वडवणी तालुक्यातील सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण शाळेच्या पहिल्याच दिवशी करण्यात येणार आहे. वडवणी तालुक्यातील ११६ शाळांमधील जवळपास १६ हजार ९५० विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व पाठ्यपुस्तके देण्यात येणार असून सर्व शाळांमध्ये ही पुस्तके पोहोच झालेली आहेत.**



महाराष्ट्र शासनाच्या वतीने शालेय शिक्षण विभागाने समग्र शिक्षा अभियानांतर्गत राज्यात मोफत पाठ्यपुस्तक योजना राबविली जाते. मात्र प्रत्येक वर्षी शाळा सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या हाती पाठ्यपुस्तके पडत असतात. कोणत्या ना कोणत्या दिरंगाईमुळे पाठ्यपुस्तके मिळण्यास उशीर होत असतो. मात्र आगामी वर्ष याला निश्चितपणे अपवाद ठरणार आहे. कारण शासन स्तरावरुन तालुका स्तरापर्यंत पुस्तके मे महिन्यामध्येच प्राप्त झालेली होती. दिनांक १६ जून २०२५ रोजी नविन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होवून शाळा उघडणार आहेत. वडवणी तालुका स्तरावर देखील पाठ्यपुस्तक वाटपाचे सूक्ष्मपणे नियोजन करुन तालुकास्तरावरुन थेट शाळानिहाय पाठ्यपुस्तके वितरण करण्यात आले असून दिनांक ६ जून २०२५ रोजीपर्यंत म्हणजेच १० दिवस अगोदरच सर्व शाळांना पाठ्यपुस्तके पोहोच करण्यात आलेले आहेत. या योजनेअंतर्गत कोणतेही बालक पुस्तकांअभावी शिक्षणापासून वंचित राहू नये, तसेच सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती १०० टक्के राखून शाळेतील गळतीचे प्रमाण शून्यावर आणावे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांना वेळेवर आणि पूर्ण पाठ्यपुस्तके मिळाल्यास त्यांचा अभ्यास हा नियमित होतो. अभ्यासामध्ये रुची निर्माण होते. आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल पालकांवरचा खर्चाचा भारही कमी होतो असे वडवणीचे कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी सांगितले. वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशासनाच्या मराठी माध्यमाच्या एकूण ९८ शाळा, उर्दू माध्यमाच्या २ शाळा, तसेच खाजगी व्यवस्थापनाच्या मराठी माध्यमाच्या एकूण १५ शाळा तर उर्दू माध्यमाची १ शाळा अशा एकूण ११६ शाळा अस्तित्वात असून या शाळांमधील जवळपास १६ हजार ९५० विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार असून शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण व्हावे यासाठीही सर्व शैक्षणिक यंत्रणा सज्ज आहे. पुस्तक वितरणासाठीच्या आवश्यक नियोजनामध्ये स्वतः गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्यासह गटसाधन केंद्रातील माजेद शेख, तुकाराम इप्पर, सुधाकर हेंडगे, नवनाथ पवार, इंद्रजीत घुमरे, तांबोळी सर यांच्या माध्यमातून सर्व पाठ्यपुस्तक साठवणूक वितरण व वहन व्यवस्था पूर्ण करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच प्रवेश दिनाच्या दिवशी पुस्तके मिळावीत याकरिता गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने एक नियंत्रण कक्ष देखील कार्यरत करण्यात आला होता. ही योजना राज्य शासनाच्या शिक्षण हक्काचा एक भाग असून शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने मोफत पाठ्यपुस्तक विचारणासह अनेक उपक्रम राबविले जात आहेत. गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात सर्व योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक आणि शैक्षणिक कर्मचारी एकत्रितपणे कार्यरत आहेत.

### गटशिक्षणाधिकारी कार्यालयाची तत्परता..

दरम्यान नव्याने सुरु होत असलेल्या शैक्षणिक वर्षाच्या शाळेच्या पहिल्याच दिवशी वडवणी तालुक्यातील सर्व माध्यमांच्या सर्व शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे पाठ्यपुस्तके मिळणार असून वडवणीचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे व गटसाधन केंद्रातील सर्व कर्मचारी वृंद यांनी अतिशय छान पध्दतीने नियोजन करुन दि.६ जून रोजीपर्यंतच तालुकास्तरावरुन प्रत्येक शाळांपर्यंत तत्परतेने पुस्तक पोहोच केलेले आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके मिळत असल्याने विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये मोठे समाधान पाहावयास मिळत आहे.

## अंबाजोगाईत रविवारी प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील सम्यक पांथस्थ आबा या गौरवग्रंथाच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**दलित युवक आघाडीचे लढाऊ शिलेदार, वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते, पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान आणि अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेतील इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील सम्यक पांथस्थ आबा या गौरवग्रंथाचा प्रकाशन समारंभ रविवार, दि. ८ जून २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता शहरातील विलासराव देशमुख न.प. सभागृह, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला आहे. तरी या कार्यक्रमास अंबाजोगाई व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**

गौरवग्रंथ प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुरेश खुरसाळे (माजी अध्यक्ष, योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई.) तर गौरवग्रंथाचे विमोचन ज.वि.पवार (ज्येष्ठ विचारवंत व आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार, मुंबई.) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच गौरवग्रंथावर भाष्यकार म्हणून प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर (प्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत, छत्रपती संभाजीनगर.), प्रा.पी.जी.जोगदंड (माजी सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समिती, मुंबई.) आणि मंगलताई खिंवसरा (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, छत्रपती संभाजीनगर.) हे आपले मौलिक विचार व्यक्त करणार आहेत. प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील सम्यक पांथस्थ आबा या गौरवग्रंथाचे संपादन ज्येष्ठ पत्रकार तथा माध्यम तज्ज्ञ प्रा.जयदेव डोळे, मंगलताई खिंवसरा, प्रा.नानासाहेब गाठाळ, लंकेश वेडे, मुक्त पत्रकार अमर हबीब, डॉ.वाल्मिक सरवदे, सुरेश पाटील, राम दोतोंडे यांनी केले आहे. तर गौरवग्रंथ समिती मध्ये ज.वि.पवार, शांताराम पंदेरे, डॉ.सुरेश खुरसाळे, डॉ.साहेबराव गाठाळ, अण्णा खंदारे, अशोक देशमुख, चंद्रशेखर बर्दापूरकर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलसचिव प्राचार्य डी.ए.चव्हाण, सुखदेव भुंबे, उपप्राचार्य गौतम गायकवाड, डॉ.नरेंद्र काळे, प्रा.अरूंधती पाटील, प्रा.माणिक कांबळे, रमेशभाई खंडागळे, रामभाऊ पेरकर या मान्यवरांचा समावेश आहे. तरी गौरव ग्रंथ प्रकाशन समारंभास आवर्जुन उपस्थित राहावे अशी विनंती व आवाहन प्रा.डॉ.चेतन सरवदे, चेतन पब्लिकेशन्स, सुधाताई जोगदंड, उत्तम जोगदंड, ॲड.विशाल जोगदंड, समीर मोरे यांनी केले आहे. गौरवग्रंथाचा प्रकाशन समारंभाच्या आयोजनाच्या पूर्वतयारी संदर्भात अंबारी शासकीय विश्रामगृहात बुधवार, दिनांक ४ जुन रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे अध्यक्षस्थान माजी मुख्याध्यापक लंकेश वेडे यांनी भुषविले. तर या बैठकीस सुखदेव भुंबे, प्रा.डॉ.शंकर वाघमारे, एम.वाय.काळे, संभाजीराव सोनवणे, प्रा.संभाजीराव बनसोडे, व्यंकटराव वेडे, ॲड.वसंतराव हजारे, शशिकांत सोनकांबळे, प्रा.एम.बी.चव्हाण, डॉ.किरण चक्रे, ॲड.डी.आर.गोरे, उत्तम जोगदंड, दिलीप वैद्य, संजय भोसले, ॲड.विशाल जोगदंड, कल्याण जोगदंड, ॲड.ए.एस.धाईजे, प्रसेनजीत मस्के, संदिपान पोटभरे हे उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन डॉ.किरण चक्रे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सुखदेव भुंबे यांनी मानले. सदरील बैठकीत कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विविध जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले. अशी माहिती माजी मुख्याध्यापक लंकेश वेडे यांनी दिली आहे.

## जिल्ह्यातील १२ आदर्श व्यापाऱ्यांना पुरस्कार पुरस्कार देऊन सन्मान-हस्तीमल बंब

जालना । प्रतिनिधी

जनरल मर्चन्टस्? असोसिएशन जिल्हा जालनाच्या वतीने एका कार्यक्रमात जिल्ह्यातील उत्कृष्ठ कार्य करणारी शाखा व १२ आदर्श व्यापार्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यात सर्वात उत्कृष्ठ कार्य मंठा शाखाचे अपंग महेश सराफ यांना तर अंबड शाखाचे विशाल लाहोटी, प्रल्हाद उगले, जाफ्राबादचे प्रल्हाद लोखंडे, भोकरदनचे ज्ञानेश्वर नवल, बदनापुरचे पंकज तापडिया, परतुरचे धीरज भंडारी, घनसावंगीचे सुदर्शन पाटील, टेंभुर्णीचे ज्ञानेश्वर डोमळे, दाभाडीचे अमोल देहाडराय, आष्टीचे अरुण डोईजडकर, कुंभार पिंपळगांवचे संतोष गबाळे, माहोरा महिला आघाडीची सौ. सुरेखा दळवी, जालना शहर प्रभाग प्रमुख बालाजी लताड, टाईम डायरीचे संचालक सुभाष सोनुने, डिजिटल आरबीट ॲपचे सुत्रधार मकरंद शहापुरकर* यांना अभिनंदनपत्र प्रदान करून पुरस्कार देण्यात आले, अशी माहिती आयोजक जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी दिली आहे. यावेळी राज्य अध्यक्ष सचिन निवंगुणे, उपाध्यक्ष सतिष पंच, सचिव संतोष सोनी, कचरु वेळंजकर, अंकुश राऊत, सुखदेव बजाज, सौ. सिता मोहिते, सौ. आनंदी अय्यर, संदीप काबरा इ. मंचावर उपस्थित होते. प्रास्ताविक करताना बंब म्हणाले मंठा शाखाचे सचिव महेश सराफ यांचा फार मोठा अपघात झालेला आहे, हे अंपग आहे. ते पायाने चालु-फिरु शकत नाही, अपंगत्वा वर मात करून जिद्द चिकाटी ने त्यांनी आपला कुटुंब, व्यवसाय संभाळुन सामाजिक कार्यात गरजु - जरुरतमंदासाठी, व्यापार्यांच्या हितात तन-मन-धनाने काम करीत आहे. सराफ यांचा कार्य जिल्ह्यात संघटना व व्यापार्यांसाठी सर्वात उत्कृष्ठ आहे म्हणून श्री सराफ यांना प्रथम पुरस्कार देण्यात आले. ज्यांचा कष्ट, परिश्रम, विशेष योगदान आहे अशा शाखांना उद्योग व्यवसायात नैतिकतेने, योग्य दरात ग्राहकांना दर्जेदार वस्तु पुरविले आहे, देशाच्या प्रगतीसाठी कर भरण्यास पुढे आहे असे लोकांची निवड करून पुरस्कार देण्यात आले आहे. पुरस्कार प्रोत्साहन, प्रेरणा देणार आहे व केलेले कष्टाची परत फेड आहे, असे बंब म्हणाले. श्री निवंगुणे, श्री पंच, सौ. मोहिते यांनी शुभेच्छा दिल्या. सर्व पुरस्कार प्राप्त सत्कार मुर्तींवर जिल्ह्यातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार गोविंद साखला यांनी केले.



## पान १ वरून...

### कोरोनाच्या वाढत्या प्रार्दुभावामुळे

आहे. तसेच पुन्हा लॉकडाऊन लागले तर काय करावे? या चिंतेत शेतकरी सध्या आहे. त्यामुळे अशा विपरीत परिस्थितीत भाजीपाला पिके, फळपिके करावी की नाही? असा प्रश्न सध्या शेतकऱ्यांसमोर आहे.

-----------

### पवारांसह ठाकरे बंधुंच्या

बंधु एकत्र येण्याचे सध्या संकेत आहेत. तर दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार असल्याच्या चर्चांना पुन्हा उधान आले आहे. याबाबत सुप्रिया सुळे यांनी सुध्दा मोठे विधान केले असून त्यांनी एक प्रकारे दोन्ही पवारांच्या मनोमिलनाबाबत मुकसंमती दिल्याचे दिसते.

----------

### वैष्णवी हगवणे प्रकरणाची

तालुक्यातील गीता गावामध्ये विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून विवाहितेने आत्महत्या केली आहे. बाहेरून चार लाख मिळाल्यानंतरही आणखी दोन लाख आणून दे अशी मागणी सासरचे लोक करत होते. सासरच्या त्रासामुळे आणखी एका विवाहितेचा जीव गेल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी मृत महिलेच्या कुटुंबियांनी केली आहे.

--------------

### मातोश्री पतसंस्थेतील आरोपींच्या

आलेला होता. सदरचा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखा, बीड येथे वर्ग झाल्यानंतर गुन्हयातील मुख्य शाखेचा घटनास्थळ पंचनामा करण्यात आला. त्यावेळी सर्व शाखेचे बारकाईने निरीक्षण करुन तसा सविस्तर शासकीय पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला. गुन्हयातील मुख्य आरोपीस अटक करुन त्यांच्याकडे अपहारीत रक्कमेबाबतव गुन्हयाबाबत विचारपुस करण्यात आली, त्यानंतर सदर पतसंस्थेचे उप निबंधक सहकारी संस्था, कार्यालय बीड येथील प्रशासकीय मंडळ मातोश्री महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या, बीड यांचेकडुन लेखा परीक्षण करुन घेवुन अहवाल प्राप्त करुन घेतला. सदर अहवालाप्रमाणे आरोपीतांनी एकुण २,३५,३९,६४०.३२/- रु.चा अपहार केल्याचे निष्पन्न झाले. ठेवीदारांच्या ठेवीची रक्कम ही ठेवीदारांना मिळणे आवश्यक असल्याने आरोपीतांच्या स्थावर व जंगम मालमत्तेचा शोध घेण्यात आला व त्या स्थावर मालमत्तेच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारावर बंदी घालण्यात आली, सदर आरोपीच्या प्राप्त मालमत्तेचे शासकीय भावाप्रमाणे मुल्यांकन काढून घेवुन एकुण ४५,८५,३६६.६ रु.चा महाराष्ट्र ठेवीदार वित्तीय संस्थेतील हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ प्रस्ताव अपर पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे कार्यालयात पाठवण्यात आलेला होता व तेथुन पुढे तो गृह विभाग, मंत्रालयात पाठवण्यात आलेला होता. गृह विभाग, मंत्रालयातुन सदर प्रस्तावास मंजुरी दिले बाबतचे आज रोजी आदेश प्राप्त झाल्याने ठेवीदार यांना त्यांनी ठेव स्वरुपात ठेवलेली रक्कम परत मिळणे सुकर झाले आहे. सदरची कामगिरी विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक संतोष शेजाळ, प्रभारी अधिकारी आर्थिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा येथील पोलीस उप निरीक्षक भारत बर्डे, सहा. पोलीस उप निरीक्षक श्रीकृष्ण हुरकुडे यांनी व इतर अंमलदार यांनी केलेली आहे.

------------

### समृद्धीवर फडणवीस- शिंदेंच्या

गाडीचे स्टेअरिंग हाती घेतले. शिंदेंच्या बाजूला मुख्यमंत्री फडणवीस होते. अजित पवार मागच्या सीटवर बसले होते. समृद्धी महामार्गावरून शिंदेनी काही वेळ गाडी चालवली. त्यानंतर गाडीचे स्टेअरिंग मुख्यमंत्री फडणवीसांनी हाती घेतले. यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही तिघेही एकत्रित गाडी चालवतोय, काही काळजी करू नका. तीन शिफ्टचे ड्रायव्हर आहोत आम्ही. चांगलं ड्रायव्हींग आहे. आम्हाला एकमेकांच्या गाडीत बसायची सवय आहे. ड्रायव्हींगची सवय आहे आणि आमची गाडी अगदी छान चाललेली आहे. आम्ही तिघेही तीन शिफ्टमध्ये चालवतोय’, असेफडणवीस म्हणाले तर अर्धी अर्धी चालवायची अगोदरच ठरलेलं, असे शिंदे म्हणाले. अजित पवारांना त्यांना एकदम बसायला शांतपणे मागे येत एकदम रिलॅक्स मूडमध्ये. फडणवीस आणि शिंदेनी गाडी चालवली, पण अजित पवार कधी गाडी चालवणार असा पत्रकारांनी विचारला. त्यावर अजित पवार हे अंपायरच्या भूमिकेत असल्याचे फडणवीसांनी म्हटले आहे.

---------------

### दुर्घटनेनंतर आरसीबीच्या

गुन्हा नोंदवण्यात आला आहे.या विजयी जल्लोषाच्या नियोजनात बेजबाबदारपणा बाळगल्याचा उल्लेख या एफआयआरमध्ये करण्यात आला आहे. सदर प्रकरणात कलम १०५, १२५ (१)(२), १३२, १२१/१, १९० आर/डब्ल्यू ३(५) या कलमांअंतर्गत गुन्हा दाखल केला गेलाय, याबाबतची माहिती एएनआय वृत्तसंस्थेकडून देण्यात आली आहे. त्यामुळे आता आरसीबीचे टेन्शन वाढले आहे. आयपीएलच्या १८ व्या मोसमातील अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने पंजाब किंग्सवर ६ धावांनी मात करत इतिहास घडवला. आरसीबीने १८ व्या वर्षी आयपीएल ट्रॉफी जिंकली आणि स्वप्न पूर्ण केले. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये झालेल्या अंतिम सामन्यानंतर आरसीबीच्या खेळाडूंचा बंगळुरुत भव्य सत्कार ठेवला होता. एम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झालेल्या कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेमुळे आरसीबीच्या या ऐतिहासिक विजयाला गाळबोट लागले.

#### राज्य सरकार आणि आरसीबीकडून मदत जाहीर

दरम्यान या दुर्घटनेनंतर राज्य सरकार आणि आरसीबी टीमकडून मृतांच्या कुटुंबियासाठी आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. राज्य सरकारने मृतांच्या कुटुंबियांना १० लाख रुपये देणार असल्याचे म्हटले आहे. तसेच जखमींवर उपचारही सरकारकडून करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तर दुसऱ्या बाजूला आरसीबीने अधिकृत निवेदन जारी करत मृतांच्या कुटुंबियांना १० लाख रुपये देणार असल्याचे म्हटले आहे.

### टी.सी.हरवला आहे.

काकडे चैतन्य हनुमंत या नावाचा वसंत कनिष्ठ महाविद्यालय, केज शाळेतून इयत्ता १२ वी विज्ञान पासचा टि.सी.दि.३ जून २०२५ रोजी केज ते साबला प्रवासादम्यान हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधवा..
संपर्क
मो.७७०९८७४२०८

# ज्वारीचे बाजारभाव स्थिर; काबुली, केळी, गवार तसेच काय आहेत आजचे आल्याचे दर?

ज्वारीचे उत्पादन चांगले झाल्याने दरावर दबाव असल्याचे दिसत आहे. रब्बीच्या ज्वारीची बाजारात आवक सुरु झाल्यानंतर दरावर दबाव वाढला होता. दरपातळी २०० ते ३०० रुपयांनी कमी झाली होती. ज्वारीच्या दरावरील दबाव आजही कायम आहे. ज्वारीला सरासरी प्रतिक्विंटल २६०० ते २८०० रुपयांच्या दरम्यान आहेत. ज्वारीची बाजारातील आवक सध्या कमी झाली आहे. पुढील काही आठवड्यांमध्ये ज्वारीची आवक कमी होण्याची शक्यात आहे. त्यामुळे दरातही सुधारणा होऊ शकते, असा अंदाज ज्वारी बाजारातील व्यापारी व्यक्त करत आहेत.



काबुली हरभरा तेजीत

काबुली हरभऱ्याचे दर तेजीतच आहेत. देशात यंदा काबुली हरभऱ्याचे उत्पादन कमी राहीले. तर दुसरीकडे मागणी चांगली आहे. त्यामुळे काबुली हरभऱ्याचे दर मागील काही आठवड्यांपासून तेजीत आले आहेत. बजारातील कमी आवक आणि चांगली मागणी यामुळे काबुली हरभऱ्याचे भावही टिकून आहेत. एप्रिल महिन्यापासून काबुली हरभरा ११ हजार ते १२ हजार रुपयांच्या दरम्यान विकला जात आहे. यापुढील काळात बाजारातील काबुली हरभऱ्याची आवक कमी होत जाईल. मात्र काबुली हरभऱ्याला उठाव चांगला राहील. त्यामुळे काबुली हरभऱ्याचे दरही टिकून राहतील, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.

केळीच दर टिकून : बाजारात मागील काही दिवसांपासून केळीची आवक कमी झाली आहे. राज्यातील काही भागात केळी पिकाचेही पावसाने नुकसान झाले. दुसरीकडे केळीला उठावही मंदावला आहे. त्यामुळे आवक कमी असूनही केळीचे भाव टिकून आहेत. सध्या केळीला सरासरी १५०० ते २ हजार रुपये प्रतिक्विंटलच्या दरम्यान दर मिळत आहे. पुढील काही आठवडे बाजारातील केळीची आवक कमीच राहण्याचा अंदाज आहे. तर मागणीही स्थिर राहण्याची शक्यता आडे. त्यामुळे दरात काहीसे चढ उतार दिसू शकतात, असा अंदाज केळी व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

गवार तेजीत

गवारचे भाव मागील २ आठवड्यात चांगलेच वाढले आहेत. गवारची बाजारातील आवक पावसामुळे कमी झाली आहे. गवार पिकासाठी एप्रिल आणि मे महिन्यात पोषक हवामान राहीले नाही. त्याचा फटका पिकाला आधीपासूनच बसत होता. मे महिन्यातील पावसाने पिकाचे नुकसान वाढले. त्यामुळे आवक कमी होऊन भाव तेजीत आले. गवारचे भाव बहुतांशी बाजारात सरासरी ६ हजार ते ७ हजार रुपये प्रतिक्विंटलच्या दरम्यान पोचले आहेत. गवारची आवक पुढील काळातही कमीच राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे गवारचे भावही टिकून राहतील, असा अंदाज व्यापारी व्यक्त करत आहेत.

आले दरात सुधारणा

आल्याच्या दरात मागील काही आठवड्यांपासून सुधारणा दिसून आली. बाजारातील आल्याची आवकही कमी झाली आहे. तर आल्याला उठाव चांगला आहे. नव्या लागवडीसाठीही आल्याची खरेदी सरु आहे. त्यामुळे दरातही सुधारणा दिसून आली. आल्याला बाजारात सध्या ४ हजार ते ५ हजार रुपयांच्या दरम्यान दर मिळत आहे. पुढेही सणांमुळे आल्याला चांगली मागणी राहील. त्यामुळे आल्याच्या दरात आणखी सुधारणा अपेक्षित आहे, असे व्यापारी सांगत आहेत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५३९ : बक्सर च्या जवळ चौसा या ठिकाणी अफगाण शासक शेरशाह सुरी आणि मुघल शासक बादशाहा हुमायू यांच्यात झालेल्या लढाईत बादशाहा हुमायू यांचा पराभव झाला.
१८९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९३८ : डी. सी. ४ प्रकारच्या विमानाचे प्रथम उड्डाण.
१९६५ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने परिणित दांपत्याने गर्भनिरोधक साधने वापरणे कायदेशीर ठरवले.
१९७५ : क्रिकेटच्या पहिल्या विश्वकरंडक स्पर्धेस इंग्लंडमध्ये सुरुवात झाली.
१९७९ : रशियातील कापुस्तिनयार येथून भास्कर-१ उपग्रहाचे प्रक्षेपण.
१९८१ : इस्रायलने इराकची ओसिराक परमाणू भट्टी नष्ट केली.
१९८५ : विम्बल्डन पुरुष एकेरीचे विजेतेपद १७ व्या वर्षी मिळवणारा बोरिस बेकर हा सर्वात तरुण खेळाडू बनला.
१९९१ : फिलिपाइन्स मधल्या माउंट पिनाटुबो ज्वालामुखीचा उद्रेक.
१९९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९९४ : नाणे निधीच्या उपव्यवस्थापकीय संचालकपदी अर्थतज्ज्ञ प्रभाकर नार्वेकर या प्रथमच एका भारतीयाची नियुक्ती झाली.
२००१ : युनायटेड किंग्डम मधील निवडणुकांत टोनी ब्लेरच्या नेतृत्वाखाली लेबर पार्टीला मोठे बहुमत.
२००४ : शिरोमणी अकाली दल (लाँगोवाल) या राजकीय पक्षाची स्थापना.
२००६ : अल कायदाचा इराकमधील म्होरक्या अबू मुसाब अल झरकावी हा अमेरिकन हवाईदलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात ठार झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३७ : अलोइस हिटलर, एडॉल्फ हिटलरचे वडील. (मृत्यू: ३ जानेवारी १९०३)
१८३७ : अलोइस हिटलर, एडॉल्फ हिटलरचे वडील.
१९१३ : लेखक टीकाकार मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू: १९ एप्रिल २०१०)
१९१४ : दिग्दर्शक, पटकथाकार, लेखक व पत्रकार ख्वाजा अहमद तथा के. ए. अब्बास यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १९८७)
१९१७ : अमेरिकन गायक, संगीतकार निर्माते डीन मार्टिन यांचा जन्म. (मृत्यू: २५ डिसेंबर १९९५)
१९४२ : लिबियाचा हुकूमशहा मुअम्मर गडाफी यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑक्टोबर २०११)
१९४९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुरिंदरसिंग निज्जर यांचा जन्मदिन
१९५७ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त सरन्यायाधीश व भारतीय सशस्त्र सैन्य न्यायाधिकरणाचे विद्यमान अध्यक्ष न्यायमूर्ती राजेंद्र मेनन यांचा जन्मदिन.
१९५९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि भारत सरकारचे माजी मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांचा जन्मदिन.
१९७४ : महेश भूपती, भारतीय टेनिसपटू.
१९७५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट व टेलीव्हिजन मालिका निर्माता आणि दिग्दर्शिका एकता कपूर यांचा जन्मदिन.
१९८१ : अमृता राव, मराठी चित्रपट अभिनेत्री.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२१ : रोमेनियाचे क्रांतिकारी ट्युडोर व्लादिमिरेस्कु यांचे निधन.
१९५४ : ब्रिटीश गणितज्ञ आणि संगणकशास्त्रज्ञ ऍलन ट्युरिंग यांचे निधन. (जन्म: २३ जुन १९१२)
१९७० : ब्रिटिश साहित्यिक इ. एम. फोर्स्टर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १८७९)
१९७८ : रोनाल्ड जॉर्ज व्रेफोर्ड नॉरिश (चित्रित), ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९९२ : डॉ. स. ग. मालशे, मराठी वाङ्मयाचे अभ्यासक आणि संशोधक.
१९९२ : नासकार चे सहसंस्थापक बिल फ्रान्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २६ सप्टेंबर १९०९)
१९९८ : शशिकांत नार्वेकर, गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष.
१९९९ : बालसाहित्यिक गोपीनाथ तळवलकर यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९०७)
२००२ : बी. डी. जत्ती, भारतीय उपराष्ट्रपती.
२०२० : चिरंजीवी सर्जा (भारतीय कन्नड चित्रपट अभिनेते, जन्म: १ ऑक्टोबर १९८४).

# कॅरी निर्भीक कोंबडी वर्षाला देते २०० अंडी

## पोल्ट्री व्यवसायासाठी आहे उत्तम पर्याय!

राज्यासह देशभरात कुक्कुट पालन व्यवसाय करणाऱ्यांसाठी एक कोंबडी चांगलीच फायदेशीर ठरणारी आहे. या कोंबडीचे पालन केल्यास उत्तम फायदा होण्याची गॅरंटी आहे. बेरोजगार तरुणांना कुक्कुट पालनासाठी महाराष्ट्र राज्य सरकारकडून बँक कर्ज देखील मिळते. त्यामुळे ज्यांना कमी भांडवलात कुक्कुट पालनाचा व्यवसाय करायचा असेल त्यांच्यासाठी ही कोंबडी चक्क वरदान ठरणार आहे.

कॅरी निर्भिक ही कोंबडीची एक देशी जात आहे, जिचे मांस प्रथिने गुणधर्मांनी समृद्ध आहे. ही कोंबडी अतिशय चपळ असते. आकाराने मोठी, ताकदवान, दिसायला देखणी, स्वभावाने लढाऊ आणि मजबूत प्रतिकार शक्तीची असते. सुमारे २० आठवड्यांच्या आतच या कोंबड्यांचे वजन १८४७ ग्रॅमपर्यंत पोहोचते. दरवर्षी या कोंबड्या तब्बल १९० ते २०० अंडी देतात आणि प्रत्येक अंड्यांचे वजन ४५ ग्रॅम असते. कॅरी निर्भीक कोंबड्यांचा पोल्ट्री फार्म सुरू करून कमी खर्चात शेतकऱ्यांना दामदुप्पट नफा कमाविता येऊ शकतो. इंडो - जर्मन यांच्या संयुक्त प्रयत्नातून या कोंबडीची जात साल २००० मध्ये विकसित करण्यात आली होती.

कॅरी निर्भीकची वैशिष्ट्ये : उत्कृष्ट अंडी उत्पादन. वर्षाला १९० ते २०० अंडी देते. प्रत्येक अंडे ४५ ग्रॅम वजनाचे असते.

२० आठवड्यांत १८४७ ग्रॅमपर्यंत वजन वाढते. प्रथिने गुणधर्मांनी समृद्ध, चविष्ट आणि रसाळ असते. मजबूत रोगप्रतिकारशक्ती, रोगांना बळी पडत नाही. कमी खाद्यपदार्थावरही चांगली वाढ होते.

कर्ज मिळण्याचीही सुविधा : कॅरी निर्भीक कोंबडी कमी खर्चात जास्त नफा देते. यामुळे लहान शेतकरी आणि तरुण उद्योजक सहजपणे हा व्यवसाय सुरू करू शकतात. विशेष म्हणजे राज्य सरकार कुकुटपालन योजनेद्वारे कुक्कुटपालनासाठी बँक कर्ज देखील मिळण्याची सुविधा उपलब्ध आहे. ज्यामुळे ग्रामीण भागात या प्रजातीच्या कोंबडीच्या मदतीने सहज कुकुटपालन व्यवसाय करू शकतात.



# जपानी रेड डायमंड पेरुची अशी करा शेती



रेड डायमंड पेरु शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. या पेरुचा दर खूप जास्त असून, बाजारात १०० ते १५० रुपये किलोने विकला जातो. हा पेरु त्याच्यातील चव आणि गोडवा यासाठी खूप लोकप्रिय आहे. या पेरुची लागवड करून शेतकरी काही वर्षांत श्रीमंत होऊ शकतात.भारतातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेतीऐवजी अपारंपारिक पिकांची लागवड करत आहेत. या प्रयत्नात ते यशस्वी होत आहेत आणि चांगली कमाई करत आहेत. बहुतांश शेतकरी विविध प्रकारच्या फळांची लागवड करतात. आजकाल रेड डायमंड पेरू देशातील शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. जपानी रेड डायमंड पेरुचा दर खूप जास्त आहे, त्यामुळे अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांनी या जातीच्या पेरुची लागवड करण्यास सुरुवात केली असून त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.

लाल डायमंड पेरुची लागवड पद्धती : रेड डायमंड पेरुच्या लागवडीसाठी १० अंश ते ४२ अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. परंतु तापमान थोडे कमी झाले तरी त्याचा उत्पादनावर परिणाम होत नाही. या जातीच्या पेरुच्या लागवडीसाठी काळी किंवा वालुकामय चिकणमाती चांगली मानली जाते, तसेच जमिनीचा (सामू) ७ ते ८ असावी.

रोप लागवड आणि रोपातील अंतर : जपानी रेड डायमंड पेरुची रोपे लावताना तुम्हाला त्यांच्यामधील जागेची विशेष काळजी घ्यावी लागेल. एका ओळीपासून दुसऱ्या ओळीपर्यंतचे अंतर सुमारे ८ फूट ठेवावे आणि रोपापासून रोपापर्यंतचे अंतर ६ फूट ठेवावे. चांगल्या वाढीसाठी शेतकऱ्यांना वर्षातून दोनदा रोपांची छाटणी करावी लागते. जेव्हा त्याचे फळ चिकूच्या आकाराचे होते तेव्हा आपण ते फळ पिशवी किंवा वर्तमानपत्राने झाकून ठेवावे. असे केल्याने पेरू पिकण्याची प्रक्रिया सुधारते आणि फळांवर डाग दिसत नाहीत.

खत आणि सिंचन : रेड डायमंड पेरुची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांनी शेणखत आणि गांडूळखत यांचा पिकांमध्ये वापर करावा. याशिवाय, एनपीके सल्फर, मॅग्नेशियम सल्फेट, कॅल्शियम नायट्रेट आणि बोरॉन यासारखी रासायनिक खते वापरू शकता. रेड डायमंड पेरुच्या झाडांना पाणी देण्यासाठी शेतकरी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करतात. याशिवाय वेळोवेळी सामान्य सिंचन देखील आवश्यक आहे.

रेड डायमंड पेरू पासून होणारी कमाई : जपानी रेड डायमंड पेरू सामान्य पेरुसारखा दिसतो. पण आतून तो टरबूजासारखा लाल असतो आणि बाहेरून तो नाशपातीसारखा गोड असतो. बाजारपेठेत स्थानिक पेरुचा भाव ५० ते ६० रुपये प्रति किलो तर जपानी रेड डायमंड पेरू १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जातो. या पेरुची लागवड करून शेतकरी सामान्य पेरूपेक्षा ३ पट अधिक उत्पन्न मिळवू शकतात. या जातीच्या पेरुची लागवड करण्यासाठी खर्च सुद्धा कमी येतो.

# हिरव्या मिरचीचे सुधारित वाण देतील भरघोस उत्पन्न

खरीप हंगामात मिरची पिकाची लागवड करायच्या विचारात असाल तर जून महिना लागवडीसाठी अगदी योग्य आहे. शिवाय त्यापासून उत्पादन सुद्धा भरघोस मिळते. हिरव्या मिरचीचे सुधारित वाण याची माहिती असने आवश्यक आहे.

पुसा ज्वाला : पुसा ज्वाला ही हिरव्या मिरचीच्या सर्वात प्रगत जातींपैकी एक आहे. मिरचीची ही जात कीड आणि कीटकांना प्रतिरोधक आहे. हिरव्या मिरचीच्या या जातीची लागवड करून शेतकरी सुमारे ३४ क्विंटल प्रति एकर उत्पादन मिळवू शकतात. हिरव्या मिरचीची ही जात पेरणीनंतर सुमारे १३० ते १५० दिवसांत पिकते. मिरचीच्या या जातीचा रंग हलका हिरवा असून त्याची झाडे कमी उंचीची आणि झुडूपासारखी असतात.

जवाहर मिर्च-१४८ : हिरवी जवाहर मिरची-१४८ या सुधारित जातीची जून महिन्यात लागवड करणे शेतकर्यांसाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. या जातीची मिरची सर्वात जलद पिकते आणि तिची चव कमी तिखट असते. मिरचीच्या या जातीच्या हिरव्या मिरचीचे प्रति हेक्टरी उत्पादन ८५ ते १०० क्विंटल एवढे मिळू शकते. जर ही मिरची वाळल्यावर तोडली तर हेक्टरी १८ ते २५ क्विंटल मिरचीचे उत्पादन मिळू शकते.

तेजस्विनी : हिरव्या मिरचीची तेजस्विनी जात जून महिन्यात लागवडीसाठी सर्वोत्तम मानली जाते. हिरव्या मिरचीच्या या जातीच्या शेंगा मध्यम आकाराच्या असतात आणि मिरचीची लांबी सुमारे १० सेंटीमीटरपर्यंत पोहोचते. पेरणीनंतर सुमारे ७० ते ७५ दिवसांनी शेतकरी या प्रकारच्या हिरव्या मिरचीची काढणी करू शकतात. तेजस्विनी जातीच्या हिरवी मिरचीची लागवड केल्यास शेतकर्यांना हेक्टरी २०० ते २५० क्विंटल उत्पादन मिळू शकते. पंजाब रेड : पंजाब रेड वाण ही हिरव्या मिरचीच्या सुधारित जातींपैकी एक आहे. तिच्या झाडाचा आकार लहान आहे आणि तिला गडद हिरवी पाने आहेत. या प्रकारच्या हिरव्या मिरचीचा आकारही फार मोठा नसतो. या जातीची लागवड करून शेतकर्यांना प्रति हेक्टरी १०० ते १२० क्विंटल हिरव्या मिरचीचे उत्पादन मिळू शकते. हिरव्या मिरचीच्या या प्रकारात तुम्हाला लाल रंगाच्या मिरच्या पाहायला मिळतात.

काशी अर्ली : काशी अर्ली या हिरव्या मिरचीच्या जातीपासून शेतकऱ्यांना भरघोस उत्पादन मिळते. या जातीची हिरवी मिरची एक हेक्टर मध्ये सुमारे ३०० ते ३५० क्विंटल उत्पादन देते. या जातीच्या मिरचीचे रोप सुमारे ७० ते ७५ सेमी उंच असून त्यांना लहान गाठी असतात. पेरणीनंतर सुमारे ४५ दिवसांत शेतकरी काशी अर्ली या हिरव्या मिरचीची कापणी करू शकतात.



# प्लास्टिक टाळून कापडी पिशव्या वापरण्याचे पंकजा मुंडे यांचे आवाहन

## मंत्रालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी केला ; एकल प्लास्टिकचा वापर टाळण्याचा संकल्प

मुंबई । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मंत्रालयात आयोजित विशेष कार्यक्रमात मंत्रालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी एकल प्लास्टिकचा त्याग करून कापडी पिशव्या वापरण्याचा संकल्प केला. मंत्रालयातील प्रत्येक विभाग एकल प्लास्टिक मुक्त झाले पाहिजे असा प्रयत्न आहे. त्यासाठी मंत्रालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी केले.पर्यावरणाचे महत्त्व ओळखून त्याचे संवर्धन करण्यासाठी काय उपाययोजना करायला हव्यात यासाठी मंत्रालयात पहिल्यांदाच अशा प्रकारचा एकल वापर प्लास्टिक निर्मूलन करण्याचा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव एन रामस्वामी, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल आदी उपस्थित होते.





यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी उत्स्फूर्तपणे तयार केलेली वापरातील एकल प्लास्टिकचा वापर टाळण्याची शपथमंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यांना दिली. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांना कापडी पिशव्यांचे यावेळी वाटप करण्यात आले.

श्रीमती मुंडे म्हणाल्या की, पर्यावरणाचे संवर्धन हा एक महत्त्वाकांक्षी विषय असून आपण सर्वांनीच पर्यावरणाच्या संवर्धनाची आवड जोपासणे आवश्यक आहे. शासकीय व खाजगी कार्यालयात सर्व कामकाजात कागद मोठ्या प्रमाणात वापरला जातो, म्हणून पर्यावरण संवर्धनासाठी आपण सर्वप्रथम मंत्रालयातील कामकाज कागद विरहित करून आपले पहिले पाऊल उचलूयात. पर्यावरणाबद्दलची ही जनजागृती आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रभर पसरवायची आहे. इतरांना जागृत करण्यासाठी आपण सर्वप्रथम आपण जागरूक राहायला हवे. पेपर व प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. प्लास्टिकच्या पिशवी ऐवजी कापडी पिशवी वापरात आणावी. प्लास्टिकला नो व पर्यावरणाला हो म्हणून आज पासून पर्यावरण संवर्धनाची शपथ घेण्याचे आवाहन मंत्री श्रीमती मुंडे यांनी केले.

मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्या की, मंत्रालयात राबविण्यात आलेला पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम फक्त उपक्रम नसून हा एक जनसंदेश आहे. आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जागरूकता आपण या उपक्रमामार्फत निर्माण करणार आहोत. पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपल्या कुटुंबीय, सहकार्य व मित्र-मैत्रिणीना पर्यावरण जोपासण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात याची माहिती द्यायला हवी. कागदाच्या व प्लास्टिकच्या वापरास आळा घालून आपण या उपक्रमाची सुरुवात करूया.

मंत्रालयात साडेनऊ हजार कर्मचारी कार्यरत असून या सर्वांनी एकल वापर प्लास्टिक मुक्तीचा हा संदेश संपूर्ण महाराष्ट्रात नेवू. माझे कार्यालय माझे घर प्लास्टिक मुक्त, पर्यावरण स्नेही ही फक्त घोषणा नसून त्याच्या अंमलबजावणीसाठी ठोस पाऊले उचलूयात. प्लास्टिक मुक्त मंत्रालय हा संकल्प मनात ठेवून सर्वांनी कागदाचा वापर टाळू व कागद विरहित प्रणाली वापरात आणू असेही त्या म्हणाल्या.



माजलगाव: दि ०५ जुन जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन तेलगाव येथील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना स्थळी चेअरमन विरेंद्र सोळंके यांच्या शुभहस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

# माजलगावात शेकापचा रस्त्यासाठी तब्बल तीन तास रास्ता रोको

## डांबरीकरण न केल्यास मंत्र्यासह सत्ताधारी आमदारांना फिरू देणार नाही – ॲड.गोले

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातून गेलेला राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी माजलगाव तेलगाव रस्त्याचे तीन तेरा वाजले असून रस्त्याला प्रचंड भेगा पडल्या आहेत, दररोज रस्त्यावर अपघातात अनेक बळी जात आहेत, या रस्त्यावर आजपर्यंत शेकडो बळी गेलेले असुन शेकडो लोकांना कायमचे अपंगत्व आलेले आहे, तर शेकडो घरे सदरील रस्त्यावरील अपघाताने उध्वस्त झाले असून अनेक कुटुंबाचा आधार हरवलेला आहे, अक्षरशः हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला असून शासनाचे त्याकडे पूर्ण दुर्लक्ष असून लोकप्रतिनिधी सदरील रस्त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या दुशासनास सामान्य जनता कंटाळलेली असून रस्त्यावरील अपघाताची मालिका थांबवण्यासाठी रस्त्याचे तात्काळ डांबरीकरण करण्यात यावे या मागणीसाठी भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्या



नेतृत्वाखाली दि ०५ जुन गुरुवार रोजी सकाळी १०:००ते ११:३०वा.शेकापच्या वतीने तब्बल दिड तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले,या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार, समाजवादी पार्टी, मौलाना आझाद कलाम युवा मंच, राष्ट्रीय काँग्रेस,डी वाय एफ आय, संभाजी ब्रिगेड शिवसेना उबाठा यांच्यासह विविध पक्ष संघटना सह हजारो नागरिकांनी सहभाग नोंदवला, तब्बल तीन -तिन किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या या वेळी पोलीस प्रशासनाने तगडा बंदोबस्त लावला होता, यावेळी बोलताना शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी शासनाला माजलगाव तेलगाव रस्त्यावर अजून किती बळी हवे आहेत..? असा संतप्त सवाल विचारत माजलगाव तेलगाव रस्त्याचे तात्काळ डांबरीकरण न झाल्यास सरकारातील मंत्र्यासह सत्ताधारी आमदारांना शेतकरी कामगार पक्ष माजलगाव मतदार संघात फिरू देणार नाही असाही इशारा दिला, या आंदोलनासाठी सलीम खान,नुमान भाई चाऊस,भाई मुंजा पांचाळ,भाई अशोक कुलकर्णी, नवीवोदिन सिद्दिकी, काँग्रेसचे हरिभाऊ सोळंके, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पावार गटाचे विश्वांभर तावरे,सतीश बुरंगे, परमेश्वर डाके, तुकाराम नावडकर, नारायण तौर, सिद्धेश्वर काळे, विलास जावळे, सय्यद फारुख, अभिषेक सोळंके राहुल सोळंके नाजेर कुरेशी, भास्कर कांबळे, सचिन पांचाळ, हनुमान पांचाळ, अविनाश गोंडे,दत्ता कांबळे,जयराम राऊत,श्रीराम शेवाळे,श्रीकृष्ण कुरे,बालासाहेब फपाळ,बालासाहेब येवले,डॉ. मनसबदार,राहुल सोनगुडे आदींनी परिश्रम घेतले व शेवटी उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या वतीने तलाठी रूपचंद आभारे यांनी आंदोलकाचे निवेदन स्वीकारले..

# जालन्याचे जिल्हा उपनिबंधक संजय कुमार बोराडे

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील तरतुदीनुसार सहकार विभागातील सहकारी संस्था गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांची सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने बदलीने नियुक्ती करण्यात येत आहे.

श्री. संजयकुमार बोराडे यांना जालना जिल्हा उपनिबंधक इथे रिक्त पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. श्री बोराडे या अगोदर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली या ठिकाणी होते आता श्री संजय कुमार बोराडे यांना जालना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना या रिक्त पदावर शासनाने नियुक्ती केली आहे. उपरोक्त अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा कार्यभार समकक्ष वा नजीकच्या कनिष्ठ अधिकाऱ्याकडे सोपवून पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे व तसा अहवाल सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत शासनास सादर करावा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील रुजू झाले त्याचा आदेश करून याबाबत योग्य ती कार्यवाही करावी

# ऐतिहासिक कारंजा टॉवरचा असाही सन्मान –युसूफ़

## मात्र गेंड्याची कातडी पांघरलेले बीड नगर परिषद अन् जिल्हा प्रशासन

बीड । प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या महत्त्वाविषयी जिथे एकीकडे सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागरूकता आली आहे तिथे मात्र दुसरीकडे बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासनाने गेंड्याची कातडी पांघरल्याचा अनुभव येत आहे. यामुळेच की काय या दोन्ही कार्यालयातील जबाबदार अधिकारी व कर्मचारी या ऐतिहासिक वास्तूकडे साधे ढुंकून पाहण्याची सुद्धा तसदी घेत नसल्याचे स्पष्ट दिसत आहे.

प्रशासकीय पातळीवर असे चित्र असले तरी मात्र दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांमध्ये या ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या इमारती विषयी मोठ्या प्रमाणात जागरूकता आली आहे. याचा अनुभव नुकताच येथे आला. बीड शहरातील रहिवासी लक्ष्मणसिंह ठाकुर यांनी त्यांच्या वाढदिवसादिनी मित्रांकडून देण्यात येणाऱ्या शुभेच्छा स्वीकारण्यासाठी ऐतिहासिक कारंजा टॉवरला निवडले. तसेच



हार-तुरे न स्वीकारता वायफळ खर्चाला फाटाही दिला. आलेल्या मित्रांकडून फक्त शालचा स्वीकार केला. त्यांच्या या निर्णयावर वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आलेले त्यांचे मित्र गणेश तपासे, झुंजार धांडे, नितीन धांडे, सुरेश शेटे यांनी आनंद व्यक्त केला तसेच ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण करून या इमारतीची गरिमा अबाधित राखावी याकरिता संघर्षरत असलेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनाही यावेळी येथे मानाने बोलविले. तेव्हा गंगाधरे यांनीही या विचारसरणीचे कौतुक करत म्हटले की, प्रत्येक बीड शहरवासीयाने ऐतिहासिक कारंजा टॉवर बद्दल असा चांगला सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर या ऐतिहासिक वास्तूचे परिपूर्ण नूतनीकरण लवकरात लवकर होण्यास हातभार लागेल. या वास्तूची गरिमा वाढेल असे म्हणून त्यांनीही ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. अशी माहिती मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा वर्धापन दिन

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण मा. खा.श्री शरदचंद्र पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार दि. १० जून २०२५ रोजी वर्धापन दिन कार्यक्रम आयोजित केला आहे.जिल्ह्यातील मान्यवर नेते व पदाधिकारी निमंत्रित आहेत.अशी माहिती जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा २६ वा वर्धापनदिन १० जुन २०२५ सकाळी १० वा. बालगंधर्व रंगमंदिर नाट्यगृह शिवाजीनगर पुणे येथे संपन्न होणार आहे.

या वर्धापन कार्यक्रमासाठी पक्षाचे विद्यमान-खासदार आमदार, माजी खासदार माजी आमदार, सर्व प्रदेश पदाधिकारी, सर्व जिल्हा निरीक्षक, जिल्हाध्यक्ष- कार्याध्यक्ष, सर्व फ्रंटचे अध्यक्ष व सेल राज्य प्रमुख, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, तसेच २०२४ निवडणुकीतील लोकसभा व विधानसभा उमेदवार, पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वर्धापन दिन कार्यक्रम होणार असून यावेळी माननीय शरदचंद्र पवार साहेब यांची मार्गदर्शन लाभणार आहे. जिल्ह्यातील सर्व निमंत्रित पदाधिकाऱ्यांनी या वर्धापन कार्यक्रमास पुणे येथे वेळेवर उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

# संस्कार, चिकाटी आणि गुणवत्ता हीच माहेश्वरी समाजाची ओळख: गौरव इंगोले

माजलगाव । प्रतिनिधी

संस्कार चिकाटी आणि गुणवत्ता हीच माहेश्वरी समाजाची खरी ओळख आहे. महाराष्ट्रच्या मातीशी हा समाज केव्हाच एकरूप झाला असून यांच्या गुणवतेचा मला खूप हेवा वाटतो असे प्रतिपादन माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी केले.महेश नवमी निमित्त तालुका माहेश्वरी सभा आयोजित गुणवंत विध्यार्थी सन्मान सोहळ्यात ते मार्गदर्शन करत होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माहेश्वरी सभेचे अध्यक्ष उमेश जेथलिया,प्रमुख मार्गदर्शक भा.शि.प्र चे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे,श्री सिद्धेश्वर संकूलाचे पालक प्रकाश दुगड,राजस्थानी सेवा समाज बीड चे जेष्ठ संचालक ओमप्रकाश करवा,गोशाळेचे झुंबरलाल बियाणी, रोहित नावंदर तालुका सचिव गोपाल मानधने, व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी प्रकाश दुगड यांनी विदर्थ्यांना भावी आयुष्यातील संधी ओळखून मार्गस्थ व्हा म्हणून सांगितले. कार्यक्रमाचे प्रतिमापूजन युवतीच्या हस्ते तर दीप प्रज्वलन मुख्य अतिथीनी केले. यावेळी सूत्रसंचालन संतोष जेथलिया व डॉ कमलकिशोर लड्डा यांनी केले प्रास्ताविक विनोद जाजू तर आभार नवलकिशोर काबरा यांनी मानले.महेश वन्दना पलक मानधने व राजनंदिनी जेथलिया यांनी व शिव तांडव स्वराज मालणी याने सादर केले.तर ऑपरेशन सिंदूर या विषयावर सुंदर रांगोळी श्री रांगोळी क्लासेस च्या सौ सुप्रिया मालणी, सौ सविता मुंदडा, कु वैष्णवी भूतडा, कु सिद्धी मानधने,गुंजन शिंदे वेदिका शिंदे यांनी काढली.तर माजलगाव येथील करवा परिवाराचे वतीने महप्रसाद आयोजित केला होता.करवा परिवाराच्या सर्व सदस्यांनी अतिशय परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तालुका युवा महिला सभेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम केले.



### बुद्धिमान समाजाचे नेतृत्व करताना कसं लागतो– खुर्पे

यावेळी मार्गदर्शन करताना अमरनाथ खुर्पे यांनी नेतृत्व करताना संघटन कौशल्य असणं खूप गरजेचे असते. बुद्धिमान आणि श्रीमंत समाजाचे नेतृत्व करताना खरा कसं लागतो. विशिष्ट चौकट तोडून माहेश्वरी सभा मागील दोन वर्षात काम करत आहे हे नक्कीच कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले

**शोभा यात्रा:** मागील दोन वर्षात वेगवेगळे प्रयोग करत या वर्षी महेश नवमीचि भव्य शोभा यात्रा शिवपालखी स्वरूपात टाळ मृदंग च्या तालात व महादेवाच्या तांडव नृत्याने काढण्यात आली. सई मालाणी व जानव्ही मालाणी यां बालकांनी महादेव पार्वतीचा देखावा सादर केला.स्वराज्य मालाणी या १४ वर्षाच्या मुलाने शिवतांडव चे वेगवेगळे प्रकार शोभयात्रेत सादर केले जे माजलगावकराचे खास आकर्षण ठरले.महिलांची संख्या लक्षणीय होती.

# तुलसी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा



बीड । प्रतिनिधी

५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रीन क्लबच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश देत पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्ष लागवड आणि त्यांचे योग्य संगोपन किती आवश्यक आहे, यावर त्यांनी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण केली.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन ग्रीन क्लबचे समन्वयक प्रा. किशोर वाघमारे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेश कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी संपूर्ण उपक्रमात उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदवला, ज्यामुळे संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभागांतील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चाकरवाडी येथील सप्ताहास शनिवारपासून सुरूवात

## शिवमहापुराण कथेची जय्यत तयारी; चार लाख लोकांची रोज बसण्याची-जेवणाची व्यवस्था







बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या पंचविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्याची सुरूवात शनिवार दि. ०७ जून रोजी होणार असून अखंड हरिनाम सप्ताहाच्या आयोजनाची तयारी तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज (तात्या) श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शना खाली पूर्ण झाली आहे. प. पू. श्री प्रदीप मिश्राजी महाराज शिवमहापुराण कथेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तपोनिधी, शांतीब्रह, गुरुवर्य महादेव महाराज (तात्या) श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या वतीने करण्यात येत आहे.

अखंड हरिनाम सप्ताह मध्ये आंतरराष्ट्रीय शिवकथाकार प. पू. प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांची शिवमहापुराण कथा दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत दि. ०८ जून ते १४ जून दरम्यान होईल, सायंकाळी अभंगवाणी (संगीत भजन) महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक मंडळी सादरीकरण करणार आहे. रात्री अभंग संकीर्तन सेवा दि. ०७ जून शनिवार लक्ष्मण महाराज मेंगडे, (श्री क्षेत्र बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनुर), दि. ०८ जून रविवार प्रकाश महाराज बोधले, (संतपिठ श्री क्षेत्र पैठण तथा राष्ट्रीय अध्यक्ष अ. भा. वा. मंडळ), दि. ०९ जून सोमवार अमृताश्रम स्वामी महाराज (मंगलमूर्ती देवस्थान, राजुरी नवगण), दि. १० जून रोजी मंगळवार भागवताचार्य मुकुंद काका जाटदेवळेकर, दि. ११ जून बुधवार रोजी माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी पुण्यस्मरणार्थ गुलालाचे कीर्तन वारकरी संप्रदायभूषण रामायणाचार्य रामरावजी महाराज ढोक, नागापूरकर यांचे सकाळी १० ते १२ होणार आहे. रात्री रामायणाचार्य समाधानजी महाराज शर्मा यांचे रात्री ८ ते १० वेळेत होणार आहे. दि १२ जून गुरुवार रोजी व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी, श्री क्षेत्र होळ, दि.१३ जून शुक्रवार रोजी महादेव महाराज राऊत, बीड, यांची कीर्तन सेवा होईल. दि. १४ जून शनिवार रोजी काल्याचे कीर्तन संदीपान महाराज हासेगावकर यांचे होणार आहे.

कीर्तन सेवा झाल्यानंतर हरिजागर,भारुड, हरिपाठ, काकडा भजन, असे भव्य दिव्य कार्यक्रमांचे आयोजन श्री क्षेत्र चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास करण्यात आले आहे. जास्तीत जास्त भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज ( तात्या) चाकरवाडीकर यांनी केले.

### व्यासपीठ पूजन

शनिवार दि. ०७ जून रोजी सकाळी मुख्य कार्यक्रम व्यासपीठ पूजन होणार आहे मंगळ कलश स्थापन, दीपरज्वलन, ग्रंथ पूजन, टाक मृदुंग वीण पूजन, धाजरोहण उपयुक्त सेवा मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे श्री बंकट स्वामी मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनूर, श्री श्री १०८ श्रीगुरु चंद्रशेखर शिवाचार्य महाराज मजलगावकर, तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, वैराग्यमूर्ती रामकृष्ण रांधवे बापू महाराज, शांतीब्रम्ह गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज श्री क्षेत्र गोरखनाथ टेकडी, एकनाथ महाराज सासुरा, ज्ञानोबा महाराज खाडे श्री क्षेत्र बरड,श्री विश्वनाथ अप्पा श्री क्षेत्र कपिलधर, श्री महादेव महाराज भारती श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान संपत महाराज गित्ते यांच्या सह साधुसंतानी व्यासपीठ पूजनाने अखंड हरिनाम सप्ताह सुरवात होणार आहे.

### १५० एकर पार्किंग

विसाव्या शतकातील महान संत श्री ज्ञानेश्वर माऊली दादा चाकरवाडीकर यांच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाला येणाऱ्या भाविकांची संख्या पहाता १५० एकर जागेवर पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

### तीन एकरवर भोजन व्यवस्था

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास देशभरातून भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार आहे. त्यामुळे भाविकांची संख्या लक्षात घेऊन तीन एकर जागेवर भोजन व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

### दैनंदिन कार्यक्रम

अखंड हरिनाम सप्ताह मध्ये पहाटे ०४ ते ०६ वाजता काकडा भजन, ०६ ते ०७ विष्णू शिव सहस्र नाम, सकाळी ०७ ते १० वाजता ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १२ गाथा भजन, रोज दुपारी ०१ ते ०४ वाजता प. पूज्य प.प्रदीप मिश्राजी यांची शिवमहापुराण कथा, ०५ ते ०६ हरिपाठ, ०६ ते ०८ अभंगवाणी संगीत भजन, रात्री ८.३० ते १०:३० महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकाराची कीर्तन सेवा, रात्री ११ वाजता भारुड हरिजागर होईल.

# ट्रॅक्टर चोरी करणाऱ्या टोळीतील चार आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद



बीड । प्रतिनिधी

चिंचवण येथून चोरी केलेल्या ट्रॅक्टरसह चोरणाऱ्या चार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जेर बंद करून ट्रॅक्टर जप्त केला.

दिनांक ३०/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे विष्णु रामकिसन तांबडे रा.चिंचवण ता.वडवणी जि.बीड यांनी फिर्याद दिली की,दि.२६/०५/२०२५ फिर्यादी यांचा पुतण्या याने फिर्यादीच्या शेतामध्ये दिवसभर ट्रॅक्टरने शेतनांगरट करुन रात्री ०७.०० वा सुमारास ट्रॅक्टर गोठयाजवळ उभा केला होता. दि.२७/०५/२०२५ रोजी सकाळी ०६.००वा. सुमारास फिर्यादी यांचा भाऊ याने फोनकरुन सांगीतले की, काल रात्री गोठयाजवळ नांगरासह उभा केलेला ट्रॅक्टर हा गोठयाजवळ दिसत नाही. फिर्यादी याने चिंचवण- धारुर-केज भागात ट्रॅक्टरचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. या वरुन सदरचा ट्रॅक्टर कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरी केला असल्याचे फिर्यादी यांची खात्री झाल्याने पान ३ वर

# प्रकाशदादांची वचनपुर्ती

## चिखलबीडच्या रस्त्याचे भुमीपुजन

### विकास मुंडेंच्या पाठपुराव्याला यश



वडवणी । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून सोन्नाखोटा ते चिखलबीड या रस्त्याची दुरावस्था झाली होती. मात्र विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी चिखलबीड चे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते विकास मुंडे. यांनी प्रकाश दादा यांच्याकडे या रस्त्याची रुंदीकरणासह मागणी केली होती. या मागणीला यश आले असून, सोन्नाखोटा ते चिखलबीड. या रस्त्याचे भूमिपूजन झाले असून रुंदीकरणासह हा रस्ता होत असल्याने,पंचक्रोशीतील जनतेने समाधान व्यक्त केले आहे.

सविस्तर वृत्त असे की बालाघाटच्या डोंगर रांगांमध्ये असलेले चिखलबीड हे गाव असून यासह पिंपळा, पिंपळ टक्का, रुई,सोनाखोटा,हे गावेही याच बालाघाटच्या डोंगर रांगेत असून सोन्नाखोटा फाटा ते चिखलबीड या मुख्य रस्त्यावर ही गावे येतात. त्यामुळे चिखलबीड पान ३ वर

# पैसे घेऊन मुलांचे लग्न लावणारी टोळी गजाआड

## वडवणी पोलीसांची मोठी कारवाई



बीड । प्रतिनिधी

तरुण मुलांचे लग्न करून देऊ असे सांगून पैशाची लूट करणाऱ्या महिला व पुरुषांना वडवणी पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०३ जून २०२५ रोजी वडवणी पोलीस स्टेशन येथे मनीषा नरेंद्र ननावरे वय २५ वर्षे राहणार संगमनेर, ही तिची मैत्रीण वैभवी राम शेटे राहणार, संगमनेर,अहिल्यानगर हिला घेऊन आली व तिने पोलिसांना माझ्या मैत्रिणीला तिचे घरच्यांनी डांबून ठेवले होते व मी तिला सोडवले अशी हकीकत कथन केली, सुरुवातीला महिला अधिकारी या नात्याने वडवणी प्रभारी वर्षा व्ह गाडे यांनी वैभवी व मनीषा हिची व्यवस्थित प्रेमाने चौकशी केली, तसेच सोडवणूक करणाऱ्या ड्रायव्हरला देखील बोलवून घेतले, परंतु या तिघांनाही बोलवून घेतल्यानंतर तींघांची स्वतंत्र चौकशी केली असता मनीषाचे दोन दिवसापूर्वी नुकतेच गणेश बंडू घाडगे व २८ वर्षे राहणार उपळी, वडवणी या तरुणाशी लग्न झालेले असून त्यांनी सध्या लग्नासाठी मुली मिळत नाही आजारासाठी मनीष्याच्या मावशीला व तिच्या काकाला त्यांनी तीन लाख रुपये नगदी दिले असे कळाले, पान ३ वर

# तेलगाव रोड ते राष्ट्रवादीभवनपर्यंत डिवायडरमधून रस्ता सोडा-खुर्शीद आलम

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले तर आ.भैय्यानी स्पॉट पाहणी केली



बीड । प्रतिनिधी

बीड शहराच्या मध्यभागातून जालना रोड ते तेलगाव रोड मार्गे पुढे जाणार्या नॅशनल हायवे रोडचे काम सुरू आहे. सदर रस्त्यावर डिवायडर टाकण्याचे काम सुरू आहे. सदर रस्त्यावरील डिवायडर मधुन आवश्यक ठिकाणी रस्ता सोडण्यात यावे अशी मागणी खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने बीडचे जिल्हाधिकारी साहेब तसेच बीडचे आ.संदिप भैय्या क्षीरसागर यांच्याकडे केली आहे, निवेदनात म्हटले आहे की बीड ते परळी तेलगाव रस्त्याचे काम सुरू असून सदर रस्त्याच्या सेंटरमध्ये डिवायडर टाकण्याचे काम सुरू आहेत. बीड शहरातील शरदपवार राष्ट्रवादी भवन ते तेलगाव नाका परळी रोड बीड बायपास पुला पर्यंत ५ ते ६ किलोमीटरचे अंतर असुन सदर मुख्य रोड भर वस्ती मधुन जातोय सदर रस्त्याच्या दोन्ही बाजुने मोठमोठ्या लोकसंख्यावाले मोहल्ले वस्त्या आहेत. सदर मुख्य रस्त्याचे दोन्ही बाजुला शाळा महाविद्यालय, दवाखाने, मंगल कार्यालय, मोठमोठे धार्मिक स्थळे आणि शापींग सेंटर आहेत त्यासाठी दक्षिण बाजुचे लोकांना उत्तर पान ३ वर

# बीड जिल्हा सहकार बोर्डाच्या अध्यक्षपदी सहकार महर्षी रामकृष्ण बांगर तर उपाध्यक्षपदी सुहास पाटील यांची निवड



बीड । प्रतिनिधी

जिल्हा सहकार बोर्डाच्या कार्यालयात दि. ४ जून रोजी नवनिर्वाचित संचालक मंडळांची सभा पार पडली. यावेळी बीड जिल्हा सहकार बोर्डाच्या अध्यक्षपदी सहकार महर्षी मा रामकृष्ण बांगर तर उपाध्यक्षपदी माजी नगरसेवक मा सुहास पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री.ए टी सानप साहेब यांनी काम पाहिले. त्यांना बीड जिल्हा सहकार अधिकारी क्ष्री आर.डी. वाघमारे साहेब यांनी सहाय्य केले.

बीड जिल्हा सहकार बोर्ड लि.बीड च्या संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच पार पडली. नवनिर्वाचित संचालका मधून अध्यक्ष ,उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली .या सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळाचा कार्यकाळ २०२५ ते २०३० असा राहणार आहे. निवडीनंतर सर्व पान ३ वर




बीड : महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराज राबविण्यात येत आहे गुरुवारी बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, मंडळ अधिकारी श्रीमती वंदना विघ्ने ,तलाठी श्रीमती ससाने, श्रीमती बोधवड यांच्या उपस्थितीत अभियान राबविण्यात आले. यावेळी माजी सरपंच विठ्ठल साळुंके, माजी सरपंच मसुराम साळुंके, माजी सरपंच विक्रम साळुंके यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे स्वागत केले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# तंबाखू विरोधी दिनी विविध उपक्रम साजरे

बीड । प्रतिनिधी

३१ मे रोजी बीड शहरातून राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम आरोग्य विभाग बीड भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रॅलीचे उद्घाटन केले.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण दिनाचे औचित्य साधून तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम याबद्दल अधिसेविका रमागिरी यांनी उपस्थित मार्गदर्शन केले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. एल. आर. तांदळे वैद्यकीय अधिकारी हनुमंत पारखे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. सत्तेंद्र दबडगावकर,प्राचार्य डॉ. सुवर्णा बेद्रे, शासकीय नर्सिंग स्कूल,प्राचार्य मोरे, प्राचार्य दहीवाळ राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठाणचे संचालक तत्वशल कांबळे संबधित अधिकारी, उपस्थित होते.तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाचे सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामाची जनजागृती करून सामान्य नागरिकापर्यंत माहिती पोहोचविण्यासाठी दर वर्षी ३१ मे रोजी तंबाखू विरोधी दिन साजरा होतो. १ मे ते १५ जून पर्यंत ४५ दिवसांचे विशेष अभियान राबविण्यात येत असून या अभियानामध्ये सामाजिक जनजागृती उपक्रम, तंबाखूमुक्त शाळा, धुरमुक्त गाव, कोटपा कायदा २००३

# मंगळसूत्र चोरणाऱ्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद



बीड । प्रतिनिधी

जरा टप फाटा भागात एका स्कुटी वरून जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरणाऱ्या तिघा जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी जर बंद करून त्यांच्याकडून ८८ हजाराचा माल हस्तगत केला.


दिनांक २५/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे सुमन सुरेश सारुक रा.नंदनवन कॉलनी नगर रोड बालेपीर बीड यांनी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, फिर्यादी हया त्यांच्या पती सोबत स्कुटी शिकण्यासाठी च-हाटा फाटा ग्राऊड येथे गेल्या होत्या परत घरी जातांना फिर्यादी स्कुटीवर एकटया जात असतांना फिर्यादी याचे पाठीमागुन अनोळखी तीन इसम हे विनानंबरच्या स्कुटीवर बसुन फिर्यादी पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल ; पुणे पोलिसांनी आखली विशेष मोहीम

पुणे : मागील काही महिन्यांमध्ये पुण्यातील महिला अत्याचार आणि गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. स्वारगेट अत्याचार प्रकरण किंवा वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण अशी अनेक प्रकरणे पुण्यामध्ये घडली असून यामुळे महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याच पार्श्वभूमीवर पुणे महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी पुणे शहर पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात आली आहे. यासाठी विशेष पोलीस पथक पीएमपी बससेवांमध्ये तैनात करण्यात आले आहे. या पथकात ४ पोलीस अधिकारी आणि २२ कर्मचारी यांचा समावेश आहे.



पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए कार्यक्षेत्रात दररोज ३८१ मार्गांवर २०,११२ फेऱ्यांद्वारे १० ते ११ लाख प्रवाशांना सेवा पुरवते. दररोज लाखो महिला बसचा वापर करुन प्रवास करतात. नोकरी करणाऱ्या महिला बसप्रवासाला प्राधान्य देतात. मात्र, काही सामाजिक कंटकांकडून बस व बीआरटी स्थानकांमध्ये महिलांना त्रास देणे, आय टिजिंग, चोरी तसेच अश्लील मजकूरांचे चित्रण आदी घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर पीएमपीएमएलच्या विनंतीवरून पोलीस आयुक्तालयाने विशेष गस्त मोहिम सुरू केली आहे. अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (२), सहाय्यक पोलीस निरीक्षक (१), पोलीस उपनिरीक्षक (१) आणि २२ पोलीस कर्मचारी यांना विविध बसमार्गांवर सक्रीय करण्यात आले आहे. हे अधिकारी व कर्मचारी प्रवासादरम्यान बसमध्येच उपस्थित राहून आवश्यक कारवाई करणार आहेत.

या मोहिमेमुळे बसमधून प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांना अधिक सुरक्षित वातावरण मिळण्यास मदत होणार आहे. ही गस्त विशेषतः गर्दीच्या वेळेत - सकाळी आणि संध्याकाळी - मुख्य बसस्थानकांवर व प्रमुख मार्गांवर केली जाणार आहे. पीएमपीएमएल आणि पोलीस विभाग यांच्यातील ही समन्वयात्मक कारवाई नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

पुण्यातील स्वारगेट बसस्थानकांमध्ये दुर्दैवी घटना घडली होती. शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये असलेल्या स्वारगेट बसस्थानकामध्ये तरुणीवर अत्याचार करण्यात आला. पहाटेच्या वेळी गावी निघालेल्या २६ वर्षीय तरुणीला फसवून बंद गाडीमध्ये बसवून तिच्यावर अत्याचार केला. फेब्रुवारी महिन्यामध्ये ही घटना घडली होती. घटना होण्याच्या काही काळ आधी तिथून पोलिसांनी गस्त देखील घातली होती. या प्रकरणातील आरोपी दत्ता गाडे याला पोलिसांनी घटनेच्या ७५ तासांनंतर अटक केली. अगदी सापळा रचून दत्ता गाडेला अटक करण्यात आली होती.

स्वारगेट अत्याचार प्रकरण उघडकीस आल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. सतत गजबजलेल्या स्वारगेट बस डेपो परिसरात ही घटना घडल्याने पोलिसांवर देखील दबाव होता. पोलिसांनी आरोपीला पकडण्यासाठी श्वानपथक, ड्रोन कॅमेरे अशा पद्धतीने यंत्रणा राबवली. आरोपीच्या गावाच्या आजूबाजूच्या परिसरासह अनेक ठिकाणी पोलिसांची शोध मोहीम सुरु होता. १०० ते १५० पोलिसांची फौज ऊसाच्या शेतात देखील आरोपीचा शोध घेत होती. या प्रकरणानंतर आता महिला सुरक्षेसाठी पुणे पोलिसांची विशेष मोहीम हाती घेतली आहे.

# आता दिवाळी घोटाळा ; जालिंदर सुपेकरांचा आणखी एक प्रताप राजू शेट्टींनी केला उघड

पुणे : पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर आयजी जालिंदर सुपेकर यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. वैष्णवी हगवणे हिचा नवरा शशांक हगवणे याचा मामा असलेला जालिंदर सुपेकर यांच्याबाबत रोज नवे धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. जालिंदर सुपेकर यांनी कैद्यांना ५५० कोटी रुपये मागितले असल्याचा मोठा दावा देखील वकिलांनी केला आहे. यानंतर आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी जालिंदर सुपेकर यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.



जालिंदर सुपेकर हे सध्या कारागृह विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक आहेत. तत्पुर्वी कारागृह विभागात कारागृह उप महानिरीक्षक ही राज्यात पाच पदे आहेत. दोन ठिकाणी अधिकाऱ्यांची नेमणूक आहे. तर नाशिक विभाग, संभाजीनगर आणि नागपूर कारागृह येथील कारागृह उप महानिरीक्षक पद रिक्त आहेत. त्यामुळे त्याचा अतिरीक्त कार्यभार सुपेकर यांच्याकडे देण्यात आलेला होता. आता त्यांचा अतिरिक्त भार काढून घेण्यात आला असला तरी कैद्यांना दिवाळीचा फराळ देताना घोटाळा केला असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे.

राजू शेट्टी यांनी जालिंदर सुपेकर यांच्या दिवाळीमधील फराळावर देखील वाढीव शुल्क लावल्याचा गंभीर आरोप केला आहे. राजू शेट्टी यांनी सोशल मीडिया पोस्ट केली आहे. त्यांनी लिहिले आहे की, दिवाळी फराळ म्हणून कैद्यांना अमिताभ गुप्ता व जालिंदर सुपेकर यांनी १२०० रूपये किलोची काजूकतली खायला घातली मात्र कैद्यांनी ती खाल्लीच नाही !, असा टोला राजू शेट्टी यांनी लगावला आहे. ४० ते ६० टक्के तफावत

पुढे त्यांनी लिहिले आहे की, राज्यातील कारागृहात कैद्यांच्या नावाखाली बड्या अधिकाऱ्यांनी रेशन व कॅन्टीन साहित्य खरेदीमध्ये प्रचंड मोठा भ्रष्टाचार केला आहे. कारागृह विशेष पोलिस महानिरीक्षक यांनी कैद्यांना दिवाळीमध्ये जे फराळाचे साहित्य दिले त्या फराळाच्या साहित्याचे दर हल्दीराम ,काका हलवाई व चितळे बंधू यांच्या दर पत्रकाप्रमाणे होते. प्रत्यक्षात कैद्यांना लोकल मार्केटमधील फराळ खरेदी करून देण्यात आला या दरामध्ये जवळपास ४० ते ६० टक्के तफावत होती, असा आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे.

पुढे ते म्हणाले की, गत दिवाळीत राज्यामध्ये जवळपास ५ कोटी रूपयाची खरेदी करण्यात आली आहे. सदरची खरेदी करण्यासाठी कोणतीही निविदा प्रक्रिया करण्यात आली नाही. सोबत फराळाचे साहित्य व त्याचे दरपत्रक टाकले आहे यावरून कारागृहात किती अनागोंदी कारभार चाललेला आहे हे लक्षात येईल, अशा शब्दांत राजू शेट्टी यांनी गंभीर आरोप केले आहेत. त्यामुळे आता राजू शेट्टी यांनी आयपीएस जालिंदर सुपेकर यांच्यावर मोठ्या घोटाळ्याचा आरोप केला आहे.

# आगामी साहित्य संमेलनाच्या स्थळाची आठ जूनला निश्चिती

पुणे । प्रतिनिधी

आगामी साहित्य संमेलन कुठे? होणार याविषयीची चर्चा साहित्य वर्तुळात सुरु झाली असून, ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्थळाची ८ जून रोजी निश्चिती होणार आहे. स्थळ निवड समितीच्या भेटीनंतर होणार्या अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या बैठकीत संमेलन स्थळाची घोषणा केली जाणार आहे. साहित्य संमेलनासाठी औदुंबर, इचलकरंजी, कोल्हापूर आणि सातारा येथील संस्थांकडून निमंत्रणे आली आहेत. यातील कोणत्या स्थळाची निश्चिती होते, याबाबतची उत्सुकता लेखक - साहित्यिकांमध्ये निर्माण झाली आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय तीन वर्षांसाठी पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे आले आहे. त्यामुळे आता आगामी साहित्य संमेलनाच्या नियोजनालाही सुरुवात झाली आहे. ९९ व्या साहित्य संमेलनाचे स्थळ निश्चित करण्यासाठी स्थळ निवड समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती पाच, सहा आणि सात जून रोजी निमंत्रक संस्थांना भेट देणार आहे. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी सदानंद साहित्य मंडळ (औदुंबर), महाराष्ट्र साहित्य परिषद (शाखा इचलकरंजी), दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा (कोल्हापूर) आणि महाराष्ट्र साहित्य परिषद (शाखा शाहूपुरी, सातारा) या संस्थांकडून निमंत्रणे आली आहेत.

या स्थळांना भेटी दिल्यानंतर स्थळ निवड समितीची बैठक ८ जून रोजी सकाळी पुणे येथे होणार आहे. त्यानंतर त्याच दिवशी सकाळी अकरा वाजता साहित्य महामंडळाची बैठक होणार असून, त्यात ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्थळावर शिक्कामोर्तब होईल, अशी माहिती साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी सांगितले. स्थळ निवड समितीत साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, उपाध्यक्ष गुरय्या स्वामी, कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, मराठवाडा साहित्य परिषदेचे रामचंद्र काळुंखे, मुंबई मराठी साहित्य संघाच्या प्रतिभा सराफ यांचा समावेश आहे.

# विद्युत रोहित्रे गायब... परवानगी नाही... नोंद नाही ; मग नेली कुणी ? पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान

कोरेगाव भीमा: लोणीकंद-वाघोली (ता. हवेली) महावितरण शाखेच्या कार्यक्षेत्रात मोठ्या क्षमतेची विद्युत रोहित्रे एकामागोमाग एक गायब होण्याच्या घटना समोर येत आहेत. अवघ्या काही महिन्यांच्या कालावधीत तब्बल ३ रोहित्रे बेपत्ता झाल्याच्या तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. या घटनांमुळे केवळ चोरीचा मुद्दा समोर आलेला नसून, महावितरणच्या यंत्रणेमधील अंतर्गत संगनमताचा संशयही अधिक बळावला आहे.



या तिन्ही प्रकरणांमध्ये पोलिसांत अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हे दाखल झाले असले, तरी अद्याप कोणताही आरोपी निष्पन्न झालेला नाही. त्यामुळे लोणीकंद-वाघोली पोलिसांसमोरही या गुन्ह्यांचा तपास करणे मोठे आव्हान ठरत आहे. एप्रिल २०२५ मध्ये वाघोलीतील गेरा वर्ल्ड ऑफ जॉय या गृहप्रकल्पामध्ये वर्ष २०१९ साली बसवलेले २०० केव्ही क्षमतेचे रोहित्र गायब झाले. ते रोहित्र २०२० पासून निष्क्रिय होते. मात्र, गतीशक्ती ॲपवरील मॅपिंगदरम्यान एप्रिल महिन्यात ते रोहित्र तेथून पूर्णतः गायब झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर वाघोली पोलिस ठाण्यात अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेत रोहित्र हटविण्याची कोणतीही नोंद महावितरणकडे नव्हती.

दुसर्या घटनेत १३ मे २०२५ रोजी लोणीकंद परिसरातील शिंदे स्टोन क्रशरजवळील डीपीवर बसविलेले ३१५ केव्हीए क्षमतेचे रोहित्र आणि त्याचे स्ट्रक्चर गायब असल्याचे उघड झाले. हे कनेक्शन काही वर्षांपासून बंद होते. गतीशक्ती ॲपच्या सर्वेक्षणादरम्यान ही बाब निदर्शनास आल्यानंतर सहायक अभियंता दीपक बाबर यांनी लोणीकंद पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तिसर्या प्रकरणात वढू येथे १०० केव्ही क्षमतेच्या मंजुरीवर प्रत्यक्षात २०० केव्ही क्षमतेचे रोहित्र बसविण्यात आल्याचे आढळून आले. याबाबत पेरणे शाखेने अज्ञात व्यक्तींविरोधात तक्रार दिली असली, तरी कोणत्या अधिकार्याच्या आदेशाने रोहित्र बदलण्यात आले, कुठल्या कारणासाठी अधिक क्षमतेचे रोहित्र वापरले, याची स्पष्ट माहिती उपलब्ध झालेली नाही.

या तिन्ही घटनांमध्ये एक बाब समान आहे. रोहित्र गायब होते आणि प्रत्येकवेळी ङ्गअज्ञात आरोपीङ्खच्या नावावर पोलिसात तक्रार दाखल होते. मात्र, ही कामे सामान्य व्यक्ती करू शकत नाहीत. रोहित्र हलविण्यासाठी विशेष तांत्रिक ज्ञान, अधिकृत मंजुरी आणि यंत्रणेशी समन्वय आवश्यक असतो. त्यामुळे या चोरीच्या घटनांमागे महावितरणमधील अंतर्गत अधिकारी, कर्मचार्यांचा हात आहे का? याची सखोल चौकशी व्हायला हवी, अशी मागणी होत आहे.

महावितरणने या घटनांमध्ये केवळ पोलिसांत तक्रार दाखल करून हात झटकले आहेत. मात्र, पोलिस तपासासाठी आवश्यक दस्तऐवज, कामकाजाच्या नोंदी, सीसीटीव्ही फुटेज, वाहनांची माहिती अथवा संबंधित कर्मचार्यांची चौकशीसंदर्भातील माहिती देणेही गरजेचे आहे.

## पिसाळलेल्या कुत्र्याचा ७ बालकांना चावा; शिक्रापूरच्या पाटवस्ती भागात भीतीचे वातावरण

तळेगाव ढमढेरे: शिक्रापूर (ता. शिरूर) येथील पाटवस्ती येथे पिसाळलेल्या कुत्र्याने सात बालकांना चावा घेतल्याची घटना मंगळवारी (दि. ३) सायंकाळच्या सुमारास घडली. या भटक्या कुत्र्यांची बंदोबस्त करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.



शिक्रापूर येथील जातेगाव रस्त्यालगत असलेल्या पाटवस्ती येथे अनेक भटके कुत्रे फिरत असून, मंगळवारी सायंकाळच्या सुमारास अचानक एका काळ्या रंगाच्या पिसाळलेल्या कुत्र्याने अंगणात खेळणार्या दीड ते चार वर्षे वयोगटातील सात बालकांना चावा घेतला.

पिसाळलेल्या कुत्र्याने बालकांना चावा घेतल्याची माहिती गावात पसरल्याने नागरिक भयभीत झाले. पाटवस्ती भागातील घडलेल्या घटनेची माहिती सकाळी उशिरा मिळाली असून, आपण तातडीने कुत्र्याचा शोध घेऊन त्याला पकडण्याबाबतची उपाययोजना करीत असल्याचे सरपंच रमेश गडदे यांनी सांगितले आहे.

शिक्रापूर ग्रामीण रुग्णालय येथे मंगळवारी सायंकाळी श्वानदंश झालेल्या सात लहान बालकांना आणण्यात आले. या रुग्णांना ग्रामीण रुग्णालयात आल्यानंतर त्यांचे लसीकरण करण्यात आले आहे.- डॉ. शहाजी कदम, वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय शिक्रापूर

# पराभव पचनी पडला नाही, उघड्या डोळ्यांनी बघतायेत पोटनिवडणुकीची स्वप्ने : बाबाजी काळेंचा मोहिते पाटलांना टोला

खेड । प्रतिनिधी

त्यांना पराभव पचनी पडला नसून, झोप लागत नाही. त्यामुळे उघड्या डोळ्यांनी पोटनिवडणूक होण्याची स्वप्ने ते पाहत आहेत, असा टोला खेडचे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी नाव न घेता शिवसेनेचे (उबाठा) आमदार बाबाजी काळे यांनी लगावला.



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून राजगुरुनगर नगरपरिषदेच्या वतीने शहरात १० रुपयांत कापडी पिशव्यांचे एटीएम मशिन ही सेवा सुरू केली आहे. माजी सरपंच शांताराम घुमटकर यांच्या हस्ते व आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, अनिलबाबा राक्षे, शिवाजी मांदळे यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. ५) या एटीएम मशिनचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी झालेल्या स्वागत समारंभात आमदार काळे बोलत होते.

सुधाताई कोठारी, रेखाताई श्रोत्रीय, मनोहर सांडभोर, नीलेश घुमटकर, किशोर ओसवाल, मंगेश गुंडाळ, ड. दीपक थिगळे, मुख्याधिकारी अंबादास गरकळ तसेच शहरातील नागरिक या वेळी उपस्थित होते.

नगरपरिषदेच्या कार्यक्रमात माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी भाषण केले. त्यात शहराला नगरपरिषद लागू करण्यापासून ते विविध विकासकामे केल्याचा उल्लेख त्यांनी केला. तसेच पाणी, कचरा, सांडपाणी या प्रलंबित व चुकीच्या कामाबद्दल प्रशासनाला जबाबदार धरत टिप्पणी केली. ते पुढच्या कार्यक्रमाला गेले आणि त्यानंतर आमदार काळे बोलायला उभे राहिले. त्यांनी सुरुवातच एकेरी उल्लेख करून केली. आता गेलेला माणूस प्रचंड खोटारडा आहे. अशा माणसाला तालुक्याने १५ वर्षे कसे सहन केले? असा प्रश्न उपस्थित केला. माझ्या व्यक्तिगत व्यवहारात लक्ष घालतो. माझी कर्जे फेडणार आहे का? तुमच्या कुटुंबातील सर्वांनी पुनर्वसन जमिनी खरेदी-विक्री केल्या, त्याचीही माहिती समोर आणणार आहे. राजगुरुनगर शहरात २५ वर्षे राहिला, सत्ता उपभोगली; मग शहरातील कचरा, पाणी, सांडपाणी प्रश्न का सुटले नाहीत? त्यांनी टक्केवारी घेऊन निकृष्ट कामे केली.

मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी सर्वांचे आभार मानले. त्यानंतर नगरपरिषद आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## हिंजवडी आयटी पार्क ते छत्रपती संभाजीनगर थेट एसटी सेवा सुरू

पुणे: हिंजवडी आयटी पार्क आणि औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणार्या कर्मचार्यांसाठी आनंदाची बातमी आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आता हिंजवडी आयटी पार्क ते छत्रपती संभाजीनगर अशी थेट बससेवा सुरू केली आहे. ही सेवा खास करून वीकेंडला गावी जाणार्या कर्मचार्यांची सोय लक्षात घेऊन सुरू करण्यात आली आहे.

एसटीच्या शिवाजीनगर आगाराकडून या सेवेची सुरुवात करण्यात आली आहे. या नवीन सेवेमुळे छत्रपती संभाजीनगर आणि आसपासच्या परिसरातून पुण्यात कामासाठी येणार्या हजारो कर्मचार्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. आता त्यांना आठवड्याच्या शेवटी थेट आपल्या गावी जाता येणार आहे आणि सोमवारी वेळेत कामावर परत येणे शक्य होणार आहे.

# आता घरबसल्या बनवता येणार मृत्युपत्र, राज्यातील पहिलाच प्रयोग पुण्यात; जाणून घ्या प्रक्रिया

पुणे । प्रतिनिधी

मृत्युनंतर मालमत्तेवरून कुटूंबात वाद निर्माण होऊ नये अथवा किंवा तुमच्या मर्जीनुसार मालमत्तेची विल्हेवाट लावयाची असेल, तर त्यासाठी मुत्यूपत्र तयार करतात. परंतु ते कसे करावे, काय काळजी काय घ्यावी, या बाबत कायदा काय सांगतो, यांची कल्पना अनेकांना नसते. त्यामुळे मुत्यूपत्रावरून पुढे वाद निर्माण होतात.

हे सर्व टाळण्यासाठी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने पुढाकार घेतला आहे. जेष्ठ नागरिकांना त्यांच्या घरी जाऊन या संदर्भातील मार्गदर्शन करण्याचा राज्यातील पहिलाच प्रयोग पुण्यात राबविण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या शंभर दिवसीय कार्यालयीन सुधारणा उपक्रमांमध्ये सह जिल्हा निबंधक वर्ग पुणे शहर कार्यालयाने विविध उपक्रम राबविले होते. साईराम या उपक्रमामध्ये 'रिस्पेक्ट' (आदर भाव) यातंर्गत ज्या ज्येष्ठ नागरिकांना 'मृत्युपत्र' या विषयावर मार्गदर्शन करण्याचे ठरविले. त्यानुसार पहिल्या टप्प्यात मोहम्मद वाडी येथील 'सोनाश्रय वृद्धाश्रमा'स सह जिल्हानिबंधक यांनी भेट देऊन तेथे वास्तव्य करीत असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना मृत्युपत्र विषयावर मार्गदर्शन केले. पुढील टप्प्यात ज्येष्ठ नागरिकांना या संदर्भात माहिती हवी असल्यास त्यांच्या घरी जाऊन मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

याबबत माहिती देताना पुणे शहर सह जिल्हानिबंधक संतोष हिंगाणे म्हणाले, जर एखाद्या ज्येष्ठ नागरिकास त्याचे मृत्युपत्र नोंदणी करावयाचे असेल आणि त्याकरिता त्याला दुय्यम निबंधक कार्यालयात तब्येतीचे कारणास्तव येणे शक्य होणार नसेल तर त्याकरिता गृहभेट हा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.त्याकरिता संबंधितांनी त्यांचे जवळच्या दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये वकील किंवा प्रतिनिधीमार्फत अर्जासहित संपर्क साधावा. अर्जाचा नमुना विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. अर्जासोबत मृत्युपत्र करणारी व्यक्ती आजारी असली तरी मृत्युपत्र करण्यासाठी मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे डॉक्टरांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.अर्ज केल्यानंतर दुय्यम निबंधक लगतच्या दोन-तीन दिवसांमधील त्यांच्या सोयीची वेळ देतात. त्याकरिता तीनशे रुपये गृह भेट शुल्क आकारले जाते. गृह भेटीसाठी जाताना व गृहभेट प्रक्रियेचे व्हिडिओ शूटिंग करून त्याची सीडी दुय्यम निबंधक यांना देण्याची जबाबदारी मृत्युपत्रकर्त्याची असते. या संदर्भात अधिक माहितीसाठी नोंदणी विभागाच्या सारथी कॉल सेंटर ८८८८००७७७७ कडे संपर्क साधावा.

# पुणे विमानतळावर आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी 'एलिजियन इंटरनॅशनल एक्झिक्युटिव्ह लाउंज'

पुणे । प्रतिनिधी

विमानतळावर आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी एलिजियन इंटरनॅशनल एक्झिक्युटिव्ह लाउंज या अत्याधुनिक लाउंज सुविधेचे उदघाटन करण्यात आले आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते गुरुवारी (५ जून) या लाउंजचे लोकार्पण झाले. ही सुविधा पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीमधील आंतरराष्ट्रीय सुरक्षा होल्ड एरियामध्ये आहे.

या लाउंजमुळे पुणे विमानतळावरून आंतरराष्ट्रीय प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आता परवडणाऱ्या दरात पंचतारांकित सोयीसुविधांचा अनुभव घेता येणार आहे. एलिजियन इंटरनॅशनल एक्झिक्युटिव्ह लाउंज हे आधुनिक डिझाइन आणि कार्यक्षमतेचा उत्तम मिलाफ आहे.

येथे प्रवाशांना आरामदायक बैठक व्यवस्था, विविध प्रकारचे रुचकर भोजन आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी खास सेवा उपलब्ध आहेत. विमान प्रवासापूर्वी आराम करण्यासाठी किंवा काम करण्यासाठी हे शांत आणि आकर्षक वातावरण अतिशय योग्य आहे.

नवीन टर्मिनल इमारत जुलै २०२४ पासून कार्यान्वित आहे. यात १० एअरोब्रिज, ३४ चेक-इन काउंटर आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान यांसारख्या अत्याधुनिक सुविधा आहेत. या इमारतीला प्रतिष्ठित फोर-स्टार ग्रिहा-रेटिंगही मिळाले आहे. आता या 'एलिजियन इंटरनॅशनल एक्झिक्युटिव्ह लाउंज'च्या जोडीने आंतरराष्ट्रीय प्रवाशांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुणे विमानतळ अधिक कटिबद्ध झाले आहे. हे नवे लाउंज पुणे शहराची एक गतिशील आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून असलेली प्रतिमा अधिक उंचावेल.

संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ